RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -१८० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि.१२ ऑगस्ट २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# गुप्ता ब्रदर्स, बाबा सहानी सुसाईड अन् उद्धव ठाकरे कनेक्शन?; शिवसेनेचा खळबळजनक दावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२ मुंबई**

राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे ३ दिवसीय दिल्ली दौऱ्यावर होते. या दौऱ्यात त्यांनी राहुल गांधी, सोनिया गांधींसह इंडिया आघाडीतील प्रमुख नेत्यांची भेट घेतली. उद्धव ठाकरे हे पत्नी रश्मी ठाकरे, मुलगा आदित्य ठाकरेंसह दिल्लीतील संजय राऊतांच्या निवासस्थानी मुक्कामाला होते. मात्र याच राऊतांच्या बंगल्यात गुप्ता ब्रदर्ससोबत ठाकरेंनी भेट झाली. ही भेट जवळपास अर्धा तास झाली या भेटीत काय झालं यावर प्रश्नचिन्ह आहे असं सांगत शिवसेना नेते संजय निरुपमांनी उद्धव ठाकरेंवर खळबळजनक आरोप केले आहेत.

संजय निरुपमांनी पत्रकार परिषदेत गुप्ता ब्रदर्सची ओळख सांगत त्यांचे फोटो दाखवले. त्यात राजेश गुप्ता, अतुल गुप्ता आणि अजय गुप्ता यांचे फोटो दाखवले. हे तिन्ही गुप्ता मूळचे उत्तराखंडमधील आहेत. १९९२ मध्ये हे दक्षिण आफ्रिकेत बिझनेस करण्यासाठी गेले. त्याठिकाणी ते इतके मोठे व्यापारी बनले की तिथले राष्ट्रपतीही यांच्या उद्योगात भागीदार होते. हळूहळू दक्षिण आफ्रिकेत अब्जावधीचा डॉलरचा घोटाळा समोर आला. तेव्हापासून हे तिघे फरार आहेत. तिघांविरोधात इंटरपोलची रेड कॉर्नरची नोटीस आहे. या तिघांमधील अजय गुप्ता हे मास्टरमाईंड आहेत त्यांचे दक्षिण आफ्रिकेतील नव्या सरकारसोबत काही बोलणी झाली त्यानंतर त्यांचे नाव गुन्ह्यातून कमी झाले. मात्र राजेश गुप्ता आणि अतुल गुप्ता हे दोघे फरार आहेत. ते आता दुबईत राहतात. दोघांनी दुबईत व्यवसाय सुरू केलाय असं निरुपमांनी म्हटलं.

मात्र २०२२ मध्ये राजेश गुप्ता, अतुल गुप्पा यांना दुबईत अटक करण्यात आली होती.



हे दोघेही बाहेर आहेत त्यांचा भारतात प्रवेश नाही. जर आले तर इंटरपोल नोटीसमुळे त्यांना अटक होईल. अजय गुप्ता हे भारतात आलेत. याच अजय गुप्तासोबत उद्धव ठाकरेंची भेट झाली का?, अजय गुप्ता बिझनेसमॅन कमी गुन्हेगार जास्त आहे. २५ मे रोजी देहरादूनमधील एका बिल्डरच्या आत्महत्येत अजय गुप्ताला अटक करण्यात आली. अजय गुप्ता आणि त्यांचे मेहुणे अनिल गुप्ता यांना देहरादूनचे प्रसिद्ध बिल्डर बाबा सहानी यांच्या आत्महत्येप्रकरणी अटकेत आहेत. सहानी हे देहरादूनचे प्रसिद्ध बिल्डर आहेत. ते तिथे १५०० कोटींचा प्रकल्प बनवत होते. या प्रकल्पात पैशाची गरज होती त्यामुळे सहानी अजय गुप्ता-अनिल गुप्ता यांना सोबत घेतले. मात्र गुप्ता इतके शातीर होते की त्या दोघांनी सहानी यांची कंपनी हिसकावण्याचा प्रयत्न केला. १६ मे रोजी बाबा सहानी यांनी तिथल्या पोलिसांना पत्र लिहिलं, माझ्या जीवाला धोका आहे. अजय गुप्ता-अनिल गुप्ता मला कधीही मारू शकतात. त्यांना माझी कंपनी हडप करायची आहे असं म्हटलं होतं. पोलीस तपास करत होती त्यातच २४ मे रोजी बाबा सहानी यांनी मुलीच्या घरी जात तिच्या इमारतीच्या आठव्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केली. त्यांच्या खिशात सुसाईड नोट होती त्यात अजय गुप्ता-अनिल गुप्ता यांचे नाव होते. उत्तराखंड पोलिसांनी तात्काळ या दोघांना अटक केली असं संजय निरुपम यांनी सांगितले.

### अजय गुप्तांनी घेतली उद्धव ठाकरेंची भेट?

गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेला अजय गुप्ता हा ११ जुलैला जामिनावर बाहेर पडतो. उद्धव ठाकरे आतापर्यंत दिल्लीला गेले तेव्हा ते हॉटेल ताज किंवा हॉटेल मोर्या इथं थांबतात. मात्र यावेळी ते संजय राऊतांच्या घरी थांबले. राऊतांच्या घरी मुक्काम का असा प्रश्न सर्वांनाच पडला होता. ताज किंवा मोर्या हॉटेलला थांबले असते तर अजय गुप्तांसोबतची भेट सर्वांना कळली असती त्यामुळे संजय राऊतांच्या घरी ठाकरेंनी मुक्काम केला का? मग तुम्ही अजय गुप्ता यांना भेटला की अनिल गुप्तांना?, गुप्ता यांच्या भेटीमागे तुमचा उद्देश काय होता? बाबा सहानी आत्महत्येत ठाकरे कनेक्शन आहे का?, गुप्ता बंधूंसोबत तुमचे काही व्यवहार आहेत का? असा सवाल संजय निरुपमांनी केला आहे.

## कपटी सावत्र भावांपासून बहिणींनी सावध राहावं
## सीएम एकनाथ शिंदेंचा विरोधकांवर हल्लाबोल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२मुंबई**

लाडकी बहिण योजना, आनंदाचा शिधा यासारख्या गरिबांसाठी असणाऱ्या योजनांविरोधात विरोधक कोर्टात गेले. गोरगरिबांच्या तोंडचा घास तुम्ही हिसकावण्याचा प्रयत्न करताय. कोविडमध्येही तुम्ही खिचडी हिसकावली. मात्र आता तुम्ही गोरगरिब बहिण, भावांचा घास हिरावताय त्याचे उत्तर तुम्हाला या निवडणुकीत तुम्हाला द्यावे लागेल. त्यामुळे या कपटी सावत्र भावांपासून सावध राहा असं मी माझ्या बहिणींना सांगतो असं विधान करत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवर निशाणा साधला आहे.



मुंबईत पत्रकारांशी संवाद साधताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, भीक घेऊ नका, विकले जाऊ नका. लाच घेऊ नका हे कुठले शब्द तुम्ही बहिणींसाठी वापरताय? तुम्हाला १५०० रुपयांचे मोल नाही. मात्र सर्वसामान्य महिला भगिनींना त्याचे मोल आहे. तिचं कुटुंब चालवायला कसरत करावी लागते. १५०० रुपये ती बहिण घरासाठी खर्च करेल. हे पैसे अर्थव्यवस्थेत येतील. अर्थव्यवस्थेलाही चालना मिळेल. माझी प्रत्येक बहिण, कुटुंबातील स्त्री अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्यामुळे मोफत सिलेंडर योजना, १५०० रुपये दिले आहेत. विरोधकांच्या टीकेला माझ्या बहिणी उत्तर देतील असं त्यांनी सांगितले.

त्याशिवाय मुघलांच्या घोड्यांना जसं संताजी धनाजी पाण्यात दिसायचे तसं उद्धव ठाकरेंना मी दिसतो. महायुतीचं सरकार स्थापन झालं. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झालाय हे त्यांना अजून पचनी पडत नाही. दररोज झोपता, उठता, बसता त्यांना स्वप्नातही मी दिसतो. सरकार पडेल, आज पडेल, उद्या पडेल, २ दिवसाने पडेल असं सांगत होते आज सरकारला २ वर्ष होऊन गेली. जे घटनाबाह्य सरकार म्हणतात, घटनाबाह्य मुख्यमंत्री म्हणतात त्यांनी आणलेल्या योजनेचे तुम्ही फॉर्म कसे भरता, बॅनर लावतात. त्यामुळे हे लोक दुटप्पी आहेत. सर्वसामान्य बहिणींची, लाडक्या भावांची या लोकांना काळजी नाही. या लोकांना केवळ घेणं माहिती आहे देणं नाही. आमचं सरकार देणारं आहे असं सांगत मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंना चोख प्रत्युत्तर दिले.

## मुंबईचे माजी पोलीस आयुक्त संजय पांडे विधानसभा निवडणूक लढवणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२मुंबई**



आगामी विधानसभा निवडणुकीचे पडघम वाजू लागले आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय हालचालींना वेग आला आहे. राज्यातील सर्वच पक्ष सध्या जोमाने कामाला लागले आहेत. दरम्यान, काही पक्षांनी विधानसभेसाठी उमेदवारांची घोषणा केली आहे. तर काही पक्ष उमेदवारांची चाचपणी करत आहेत. अशातच मुंबईचे माजी पोलिस आयुक्त संजय पांडे यांनी देखील निवडणूक लढवण्याची घोषणा केली आहे. विशेष म्हणजे त्यांनी प्रचाराला सुरुवातही केली आहे.

विधानसभा निवडणुकीच्या अधिकृत घोषणेपूर्वीच फोन टॅपिंग प्रकरणात वादग्रस्त ठरलेले मुंबईचे माजी आयुक्त संजय पांडे यांनी निवडणूक लढवण्याबाबत घोषणा केली आहे. संजय पांडे विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उडी घेतली आहे. संजय पांडे वर्सोवातून विधानसभा निवडणूक लढवणार असल्याचे सांगण्यात येत आहे. संजय पांडे हे कोणत्या पक्षातून निवडणूक लढवणार, याबाबत अद्याप काही सांगितलं नाही. दरम्यान, संजय पांडे यांनी स्वतः आपल्या उमेदवारीबाबत घोषणा केली. मात्र, कोणताही पक्ष सोबत नाही, असं देखील संजय पांडे यांनी स्पष्ट केलं आहे.

संजय पांडे हे वर्सोवातून विधानसभा निवडणूक लढवणार आहेत. रविवारी संजय पांडे यांनी वर्सोवाच्या झुलेलाल मंदिरात नतमस्तक होतं प्रचाराला सुरूवात केली आहे. यानंतर त्यांनी फेसबूकवर पोस्ट करत लिहिले की, वर्सोवा येथे झुलेलाल मंदिरातून वर्सोवा विधानसभा मतदारसंघासाठी प्रचारची सुरुवात केली आहे. कुठलाही पक्ष नाही, पण प्रयत्न करू... असे त्यांनी त्यांच्या पोस्टमध्ये लिहिले आहे.

## 'शरद पवारांचा राज ठाकरेंवर जोरदार पलटवार'; म्हणाले मी या रस्त्याने कधी जात नाही, मला महाराष्ट्र ओळखतोय

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२ मुंबई**

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या ताफ्यावर शुक्रवारी बीडमध्ये 'सुपारीबाज' म्हणत काही लोकांनी सुपाऱ्या फेकल्या. यावरून महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली. ज्यानंतर शरद पवारांचं आणि उद्धव ठाकरेंचं नाव घेऊन राज ठाकरेंनी टीका केली. याबाबत आज शरद पवारांना विचारलं असता त्यांनी या प्रश्नाचं उत्तर दिलं आहे.तसंच मी असे मार्ग कधीही वापरत नाही असंही शरद पवार यांनी म्हटलं आहे.

राज ठाकरेंनी दोन- तीन वेळा माझं नाव का घेतलं हे मला कळलेलं नाही. कारण मी या रस्त्याने कधीच जात नाही. मला माझा महाराष्ट्र थोडासा ओळखतो. माझी अशी पार्श्वभूमी नाही, मी कधीही आग्रह केलेला नाही करणार नाही. त्यांनी कारण नसताना माझं नाव घेतलं आहे. मी पण आज महाराष्ट्रात फिरत आहे. माझ्या पण गाड्या अडवल्या आहेत. आता हे पण पवारांनी सांगितलय का मला अडवा? अशी प्रतिक्रिया शरद पवारांनी दिली.




यानंतर राज ठाकरेंचा जो आरोप होता की शरद पवारांनी मणिपूर सारखी स्थिती निर्माण करायला हातभार लावू नये यावरही पवारांनी भाष्य केलं. शरद पवार म्हणाले, मणिपूरचा प्रश्न वेगळा आहे. हातभार लावण्याचा प्रश्न कुठे येतो. मी बोललो हे हातभाराचे लक्षण आहे की सौजन्याचे लक्षण आहे? असा प्रति सवाल पवारांनी केला आहे.

## पोलीस भरतीच्या लेखी परीक्षेत कॉपी; आयुक्तांनी १३ जणांना दाखवला घरचा रस्ता, ३ पोलिसही निलंबित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२नागपूर**

पोलीस भरतीच्या लेखी परीक्षेत कॉपी झाल्याचा धक्कादायक प्रकार नागपूरमध्ये समोर आला आहे. याप्रकरणी पोलीस आयुक्त रवींद्र कुमार सिंघल यांनी १३ जणांना थेट घरचा रस्ता दाखवला आहे. तसंच, २ पोलीस कर्मचाऱ्यांना देखील निलंबित करण्यात आलं आहे. यामुळं भरती परीक्षांमध्ये गैरप्रकार करणाऱ्यांचं धाबं चांगलंच दणाणलं आहे.



नागपूरमध्ये पोलीस भरतीत लेखी परीक्षेदरम्यान कॉपी करणाऱ्या १३ परीक्षार्थींना नागपूर पोलीस आयुक्त रवींद्र कुमार सिंघल यांनी अपात्र घोषीत केलं आहे. काही दिवसांपूर्वीच याबाबतची तक्रार आयुक्तांकडं आली होती. या तक्रारीत म्हटलं होतं की, भरतीच्या लेखी परीक्षा दरम्यान विद्यार्थी कॉपी करत असताना त्याकडं पीएसआय आणि दोन शिपायांनी दुर्लक्ष करत त्यांना परीक्षेत गैरप्रकार करण्यास अप्रत्यक्ष मदत केली.पोलीस आयुक्तांनी या तक्रारीची गांभीर्यानं दखल घेत पीएसआय आणि दोन पोलीस शिपायांना निलंबित केलं होतं. त्यामध्ये आता पोलीस आयुक्तांनी १३ परीक्षार्थींना अपात्र घोषित केलं.

## हर घर तिरंगा उपक्रम दि.१३ ते १५ ऑगस्ट दरम्यान नागरीकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे; प्रत्येक घरावर राष्ट्रीय ध्वज फडकवावा - सौरभ कटियार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

स्वातंत्र्य दिनानिमित्त शहरात दि. ९ ते १५ ऑगस्ट या कालावधीत हर घर तिरंगा उपक्रम राबविण्यात येणार आहे. नागरिकांनी दि. १३ ते १५ ऑगस्ट २०२४ या कालावधीत प्रत्येक घरावर राष्ट्रीय ध्वज फडकवावा, असे आवाहन महानगरपालिका आयुक्त तथा जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले आहे. हर घर तिरंगा उपक्रम दि. १३ ते १५ ऑगस्ट २०२४ या कालावधीत मागील वर्षीप्रमाणे यावर्षीही प्रत्येक घरावर राष्ट्रीय ध्वज फडकविण्यात येणार आहे. तसेच तिरंगा यात्रा, तिरंगा रॅली, तिरंगा मॅरेथॉन, तिरंगा सांस्कृतिक कार्यक्रम, तिरंगा कॅनव्हॉस, तिरंगा प्रतिज्ञा, तिरंगा सेल्फी, तिरंगा ट्रिब्युट, तिरंगा मेळा आदी उपक्रम राबविण्यात येणार आहे.

जनतेच्या मनात स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती तेवत रहाव्यात व देशभक्तीची जाज्वल्य भावना कायमस्वरुपी मनात राहावी व त्याचे स्मरण व्हावे या उद्देशाने या देदिप्यमान इतिहासाचे अभिमानपूर्वक संस्मरण करण्यासाठी दि.१३ ते १५ ऑगस्ट या कालावधीसाठी हर घर तिरंगा हा उपक्रम राबविण्यात येत आहे. महानगरपालिका क्षेत्रातील प्रत्येक घरावर तिरंगा डौलाने फडकावा, यासाठी सर्व नागरिकांनी उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन महानगरपालिका आयुक्त तथा जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले आहे. प्रत्येक शहरातील, प्रत्येक घरावर तिरंगा फडकावा याकरीता या उपक्रमामध्ये सर्व जनतेने उत्स्फूर्तपणे सहभागी होण्याचे व ध्वजसंहितेचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन महानगरपालिका आयुक्त तथा जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले आहे. प्रत्येक ठिकाणी हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी भरीव जनजागृती करण्यात येत आहे. ध्वज संहितेनुसार, आपला राष्ट्रध्वज हा हाताने काढलेला किंवा विणलेला अथवा मशीनद्वारे तयार केलेला असावा. सूत, पॉलिस्टर, सिल्क, खादी किंवा लोकरीपासून तयार केलेला तिरंगा चालेल. प्लास्टीक किंवा कागदी झेंडा फडकवू नये. राष्ट्रध्वजाचा अर्थात तिरंगाचा आकार हा आयताकृती असेल. तसेच त्याची ठेवण ३:२ या प्रमाणात असावी.

तिरंगा फडकवतांना नेहमी झेंड्यातील केशरी रंग हा वरच्या बाजूने आणि हिरवा रंग हा जमिनीच्या बाजूने राहील, याची काळजी घ्यावी. यात चूक केल्यास तो तिरंग्याचा अवमान समजण्यात येतो . राष्ट्रीय ध्वज लावतांना स्तंभाच्या वरच्या टोकावर लावावा. त्याला स्तंभाच्या मध्ये अगर खाली किंवा इतरत्र लावू नये, केवळ फडकवण्याआधी त्यात फुले किंवा पाकळ्या ठेवण्यास मनाई नाही, तसेच राष्ट्रध्वज उतरवतांना पूर्ण सावधानतेने आणि सन्मानाने हळूहळू उतरवावा.

## संपादकीय ......

# राजकारणामध्ये एकमेकांचा खेळ नारळ आणि सुपाऱ्या

रंगपंचमी किंवा धुळवड या दिवशी एकमेकांच्या अंगावर रंग फेकला जातो. वर्षातून एकदाच साजरा होणारा हा सण जवळपास संपूर्ण भारतात साजरा केला जातो. पुढे चालून कोणाचा निषेध करायचा असेल तर शाई फेकण्याची फॅशन आली. एखादा नेता गडबडीत कोणते उद्घाटन करायला जात असेल तर शाईच्या पेनातून सपकन त्याच्या अंगावर शाई फेकली जाते. सरकारी कर्मचार्यांविरुद्ध आंदोलन असेल तर तोंडाला काळे फासणे हा प्रकार आता तसा रूढ झाला आहे. राजकारणामध्ये एकमेकांचा खेळ करण्यासाठी चेहर्याला रंग लावणे, काळे फासणे, गाडीवर शेण फेकणे इत्यादी प्रकार सुरू असतानाच नुकत्याच घडलेल्या घटनांमध्ये एक नावीन्यपूर्ण प्रकार समोर आला आहे आणि तो म्हणजे सुपार्या आणि नारळ फेकणे होय.

नुकत्याच एका पक्षाच्या कार्यकर्त्यांनी दुसर्या पक्षाच्या नेत्याच्या दिशेने सुपार्या फेकल्या. निवडणुका जवळ आल्या की, सदरील नेता हा सुपारी घेऊन काम करतो, असा कार्यकर्त्यांचा समज होता. याचा निषेध करण्यासाठी त्यांनी त्या नेत्याच्या दिशेने सुपार्या फेकल्या. एखाद्याची सुपारी घेणे, एखाद्या पक्षाची सुपारी घेणे, मांडवली करणे, गेम करणे हे राजकारणाचे नवीन डावपेच आता आपण जनतेने माहीत करून घेतले पाहिजेत.

ज्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी त्यांच्या नेत्याच्या दिशेने सुपार्या फेकल्या, त्याच्या कार्यकर्त्यांना राग येणे साहजिकच होते. त्यांनी लगेच दुसर्या दिवशी सुपारी फेकणार्या पक्षाच्या नेत्याच्या दिशेने नारळ फेकले. नारळ देणे म्हणजे निरोप देणे या अर्थाने असले तरी त्याचे अनेक अर्थ असतात. विशेष म्हणजे सुपारी आणि नारळ या दोन्हीचे भारतीय संस्कृतीमध्ये फार मोठे महत्त्व आहे. सुपारी ही प्रत्येक पूजा सुरू करण्यापूर्वी श्री गणपतीचे प्रतीक म्हणून मांडली जाते. श्रीगणेशाची स्थापना सुपारीच्या रूपात होते आणि नंतरच बाकीची पूजा होत असते. पूजेमध्ये नवग्रहांचे अस्तित्व असावे म्हणून नऊ सुपार्या मांडल्या जातात आणि त्याला हळदी-कुंकू वाहून या नवग्रहांची पूजा केली जाते.

अशाच प्रकारच्या पूजांमध्ये कलश आणि नारळ तितकेच महत्त्वाचे आहेत. कलशावर नारळ ठेवून मगच पूजा संपन्न होत असते. नारळ आणि सुपारी या पूजेमध्ये असणार्या अत्यंत महत्त्वाच्या दोन बाबी एकमेकांवर फेकण्यासाठी वापरल्या जात आहेत, याचे आपणा सर्वांना आश्चर्य वाटले आहे. तूर्त दगडधोंडे फेकण्यापेक्षा एकमेकांवर नारळ, सुपार्या फेकलेल्या बर्या, असे वाटण्याइतके राजकारण खालच्या थराला गेलेले दिसून येत आहे. आपला म्हणजे सामान्य जनतेचा या सर्व बाबींना नाइलाज आहे, हे लक्षात घेऊन पुढे काय काय फेकले जाईल, याकडे उत्सुकतेने आपण पाहत राहू हे निश्चित. आता देशातील आणि राज्यातील राजकारण इतके टोकला पोहोचले आहे की, कधी काय होईल, याचा नेम राहिलेला नाही. राजकराणातील नैतिकचा हरवून बसली आहे, ज्यामुळे एकमेकांवर शाई फेकणे, सुपार्या फेकणे अशा प्रकारच्या घटना वाढल्या आहेत. केवळ राजकरणात आपली पोळी भाजपण्यासाठी लोक कोणत्या थराला पोहोचू शकतील, याची काही शाश्वती राहलेली नाही. सर्वसामान्य लोकांना याकडे पाहण्याशिवाय कोणताच पर्याय राहिलेला नाही; पण राजकारण्यांनी आता आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. अशा प्रकारच्या निषेधार्ह घटना घडू नयेत म्हणून राजकीय पक्षांच्या नेत्यांनी काही तरी करायला हवे.

# दिलेल्या आश्वासनाला हरताळ !

## राज्य सरकारी कर्मचारी-शिक्षकांची व्यथा !, २९ ऑगस्ट पासून बेमुदत संपाचा निर्धार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२ अमरावती** १९मार्च २०२३ मध्ये सांप्रत राज्य शासनाने, १७ लाख सरकारी कर्मचारी-शिक्षक यांच्या ७ दिवसांच्या संपात न भूतो न भविष्यती उद्रेक अनुभवला आहे. या नेमस्त परंतु प्रखर असणाऱ्या आंदोलनाचा सकारात्मक विचार करुन, राज्य शासनाने कर्मचारी शिक्षकांच्या समन्वय समितीसह दिर्घ चर्चा केली. त्यावेळी खुद्द मुख्यमंत्र्यांनी जुन्या पेन्शनप्रमाणे कर्मचारी-शिक्षकांना आर्थिक व सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यात येईल अशी लेखी हमी दिली. त्यानंतर डिसेंबर २०२३ पर्यंत त्याबाबत कोणतीच सकारात्मक प्रगतीशील कार्यवाही दिसून न आल्यामुळे कर्मचारी-शिक्षकांनी पुन्हा १४ डिसेंबर २०२३ पासून बेमुदत संपाची घोषणा केली. सदर संप आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राज्य




शासनासह पुन्हा झालेल्या चर्चेनुसार तत्कालीन अर्थसंकल्पीय अधिवेशनात, सुधारित राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना जाहीर केली. परंतु पुन्हा येरे माझ्या मागल्या प्रमाणे आजपर्यंत शासनाने कोणत्याही स्वरुपात सुधारित पेन्शन संदर्भातील शासन निर्णय किंवा अधिसूचना अद्याप पारित केलेली नाही. त्यामुळे राज्यातील सुमारे साडे आठ लाख संबंधित कर्मचारी-शिक्षक संतप्त झाले आहेत. सुधारित पेन्शनच्या भवितव्याबाबत ते चिंतित झाले आहेत.तसेच केंद्राप्रमाणे ग्रॅच्युईटी द्या, १२ वर्षानंतर सेवानिवृत्ती वेतन/अंशराशीकरण पुनर्स्थापना करा, केंद्राप्रमाणे १ नोव्हेंबर २००५ पूर्वी जाहिरात/अधिसूचना व्दारे नियुक्ती प्रक्रिया सुरु झालेल्या कर्मचारी/शिक्षकांना १९८२ ची जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करा, व सबत इतर काही मागण्या प्रलंबित मागण्यांबाबत मुख्य सचिव पातळीवर चर्चासत्र आयोजित करून, शासन निर्णय पारित केले जातील असे निसंदिग्ध आश्वासन शासनातर्फे देण्यात आले होते. या आश्वासनाला वाटाण्याच्या अक्षता तर लावल्या नाहीत ना ? अशी भावना सर्वदूर महाराष्ट्रातील कर्मचारी शिक्षकांच्या मनात उत्पन्न झाली आहे.एकंदरीत वरील परिस्थितीमुळे राज्यातील १७ लाख कर्मचारी-शिक्षक कमालीचे संतप्त आहेत. नाईलाजाने त्यांचा हा संताप गुरुवार दि. २९ ऑगस्ट २०२४ पासून बेमुदत संप आंदोलनाचा निर्णय काल मुंबईत झालेल्या राज्यस्तरीय समन्वय समितीच्या सभेत एकमुखाने घेण्यात आला. कर्मचारी-शिक्षकांना दिलासा देणारी कार्यवाही करणे राज्य शासनाला सहज शक्य आहे. राजकीय इच्छाशक्ती दाखवून शासनाने आगामी तीव्र संघर्ष टाळावा, अशी अपेक्षा समन्वय समितीचे निमंत्रक विश्वास काटकर यांनी या समयी व्यक्त केली.

# तिवसा तालुक्यातील तीन मुलींची पोलीस भरतीत भरारी

## तिवसा वासियांनी नुकत्याच रुजू झालेल्या मुलींचे सन्मान करून काढली मिरुवणूक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अमरावती-** नुकत्याच संपन्न झालेल्या पोलीस भरतीत तिवसा तालुक्यातील तीन युवतीनी मेहनतीच्या बळावर पोलीस विभागात लागण्याचा संकल्प पूर्ण केला.सामान्य परिवारातून शेतकरी,मजूर असलेल्या कु.अपूर्वा राजेंद्र अर्मळ(तिवसा)अमरावती पोलीस दल,कु.रसिका नांदणे(चांदुर ढोरे)नागपूर सिटी पोलीस दल तथा कु.स्वाती राजेंद्र पुनशे(ममदापुर) अमरावती



ग्रामीण पोलीस दलात मुलीने राज्यस्तरीय परीक्षा उत्तीर्ण झाल्या बद्दल बेस्ट अकेडमी पोलीस दल तिवसा,सामाजिक क्षेत्रातील,राजकीय क्षेत्रातील तथा तिवसा तालुक्यातील नागरिकांनी नव्याने रुजू झालेल्या पोलीस दलात तीन मुलींचे सन्मान करून तिवसा नगरीत त्यांची ढोल ताशे,गुलाल,फटकाच्या आतिषबाजीत मिरवणूक काढण्यात आली.

# केळी पिकात करपा सिगाटोका रोग कसा येतो? कसे कराल नियंत्रण

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक**

केळीतील करपा (सिगाटोका) या रोगामुळे केळीच्या उत्पादनामध्ये मोठी घट येते व रोगग्रस्त झाडावरील फळांना बाजारात योग्य भाव मिळत नाही. या रोगामुळे केळीची प्रत कमी झाल्याने उत्पादन व आर्थिक बाबींवर प्रतिकुल परिणाम होत आहे.

करपा रोगाचा प्रसार प्रामुख्याने हवेव्दारे होतो पावसाळ्यात व हिवाळ्यात पडणारे दव, भारी जमीनीतील लागवड पाण्याचा अयोग्य निचरा असणाऱ्या जमीनीत लागवड करणे रोगाच्या वाढीस आर्द्रता व उष्ण हवामान आवश्यक असते. (२२ ते २८ अंश सेंग्रे तापमान व ८० टक्के आर्द्रता)




**करपा रोगाची लक्षणे**

रोगाची सुरवात झाडाच्या खालच्या पानांवर होते.

सुरवातीला ठिपके लहान, लांबट वर्तुळाकार फिक्कट पिवळे दिसून येतात.

ठिपके पानांच्या शिरेस समांतर वाढत जावून

पिवळ्या रेषेच्या स्वरूपात दिसतात.

कालांतराने ठिपके राखाडी रंगाचे होवून भोवताली पिवळसर वलय तयार होते.

ठिपके साधारण १ ते २ मी.मी. ते २ ते ३ से.मी.

करपा रोगाची ठिपके सर्वसाधारणपणे पानांच्या कडांवर/शेंडयावर आढळून येतात.

**करपा रोगाचा प्रसार**

बुरशी लैंगिक आणि अलैंगिक

लैंगिक बिजाणू हवेमार्फत दूरवर वाहून केले जाते.

अलैंगिक बिजाणूचा प्रसार रिमझिम पडणारा पाउस, दवबिंदू, सिंचन इत्यादी.

लैंगिक बिजाणूमुळे नविन बागेवर रोगाची लागण.

**रोग प्रसारास कारणीभुत घटक**

१) हवामान : तापमान २३ ते ३० सें. ग्रेड आर्द्रता ८० ते ९० टक्के व रिमझिम पाउस

२) झाडांचे वय/अवस्था : झाडांचे जूने पान व सर्वात खालचे अकार्यक्षम पाने रोगास बळी बळी पडतात.

३) झाडाची वाढ/जोम : झाड जोमदार व सशक्त असेल तर रोगास कमी बळी पडतात. याउलट झाड कमकुवत असेल तर रोगास जास्त प्रमाणात बळी पडतात.

४) अन्नद्रव्य व पाण्याचे व्यवस्थापन : बागेला असंतुलीत व गरजेपेक्षा कमी अन्नपुरवठा कमी केल्यास रोगाचे प्रमाण वाढते. तसेच गरजेपेक्षा जास्त पाणी देणे यामुळेसुध्दा रोगाचे प्रमाण वाढते. याकरीता पाणी ठिबक सिंचनापे दयावे व बागेत ड्रेनेज चाऱ्या खोदाव्यात.

५) झाडाची अवस्था : रोगाचा




प्रादुर्भाव झाड मुख्य वाढीच्या अवस्थेत, फळधारणेच्या काळात व झाडावर घड असतांना मोठया प्रमाणात होते. ही अवस्था पावसाळी हंगामात झाल्यास रोगाचा प्रकोप जास्त प्रमाणात होतो. तसेच अनेक शेतकरी घड पोसण्याच्या काळात रासायनिक खते नेहमी देत नाही त्यामुळे रोगाचे प्रमाण वाढते.

६) इतर मशागतीची कामे : बागेतील रोगग्रस्त पाने नियमीत न काढणे, तण नियंत्रण न करणे बाग अस्वच्छ ठेवणे, शिफारशीपेक्षा कमी अंतरावर दाट लागवड, कंद प्रक्रिया अभाव, सर्वसाधारण स्वच्छतेचा अभाव, पिकाची फेरपालट, प्रतिबंधात्मक फवारणींचा अभाव इत्यादी.

**करपा रोगामुळे होणारे नुकसान**

हरीतद्रव्याचा ऱ्हास, पाने फाटतात, पाने करपतात.

कार्यक्षम पानांची संख्या कमी होते.

अन्ननिर्मीतीच्या प्रक्रियेत बाधा.

घडातील केळी आकाराने लहान, गर भरत नाही, घडातील फळे अकाली पिकू लागतात.

**रोगाचे प्रभावी व्यवस्थापन व नियंत्रण**

मशागतीच्या पध्दतीने रोगाचे नियंत्रण करणे.

रोगग्रस्त पाने कापणे किंवा पानाचा रोगग्रस्त भाग कापणे.

शिफारसीनुसार योग्य अंतरावर लागवड करणे.

रोगमुक्त व जोमदार टिश्युकल्चर रोपे/कंद लागवड करणे.

कंदाची लागवड करतांना कंद बुरशीनाशकाच्या द्रावणात बुडवून लावणे.

शिफारशीप्रमाणे अन्नद्रव्याचा पुरवठा करणे.

बागेत पाण्याचा निचरा निर्माण करणे, गरज असल्यास चर काढणे, बाग वाफसा स्थितीत ठेवावी.

पावसाळयापुर्वी बुरशीनाशकाची फवारणी.

खोडवा घेण्याचे टाळावे.

**रासायनिक नियंत्रण**

बुरशी नाशकांचा वापर केल्यास रोगाचे नियंत्रण प्रभावीपणे करता येते.

स्पर्शजन्य बुरशीनाशके पानांच्या पृष्ठभागावरील रोगाचे स्पोअर नष्ट करतात. आंतरप्रवाही बुरशीनाशके पानांमध्ये आत शिरून पानाच्या पेशीतील रोगाला नष्ट करतात.

कोरडया हवामानामध्ये १५ दिवसाला एक फवारणी व तर पावसाळ्यात ढगाळ वातावरणात १० दिवसांनी एक बुरशीनाशकाची फवारणी घेणे आवश्यक आहे.




# खोकल्यातून रक्त येतंय ? तर मग सावधान!

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक**

खोकला येणे हा काही खूप गंभीर आजार नक्कीच नाही. अनेकदा सर्दी किंवा घशातील संसर्ग यामध्ये खोकलाही येतो, पण खोकताना जर रक्त पडत असेल तर मात्र घाबरगुंडी उडते आणि ते स्वाभाविकही आहे.



असे पहिल्यांदाच झाले असेल तर आणि रक्त अगदी थोडेसेच असेल तर त्याकडे अनेक जण दुर्लक्ष करतात; पण खोकल्याबरोबर रक्त येणे हे अनेक आजारांचे प्राथमिक लक्षण असू शकते. त्याकडे दुर्लक्षही करता कामा नये. खोकल्याबरोबर रक्त पडणे हे अनेक आजारांचे संकेत असू शकतात.

**सर्वसाधारण खोकला :** खोकल्यावरोवर रक्त पडल्यास चावरून जाऊ नका. काही वेळा सर्वसाधारण खोकला असती आणि छातीचा संसर्ग आणि ब्राँकायटिसमुळे तो जास्त वाढतो, या कारणांनी खोकल्यातून रक्त पडत असेल तर थावरून वावचे कारण नाही. खोकताना रक्त पडल्यास वैद्यकीय सल्ला जरूर घेतला पाहिजे हातीचा संसर्ग हा हवेतील विषाणूंमुळे होतो.

**पल्मोनरी एम्बोलिजम:** पल्मोनी एम्बोलिजम हा फुफ्फुसांशी निगडित एक धोकादायक विकार आहे. पुफ्यूसात रक्ताच्या पुतळ्या जमा झाल्याने हा आजार जडतो. या विचारामुळे खोकल्याबरोबर रक्त पडणे, कांतीत तीव्र वेदना होणे आणि श्वास घेण्यास अडचण सत्रख्या समस्या निर्माण होतात.

जखमेमुळे किंवा कमी प्रमाणात चालणे या कारणांनी हात किंवा पाय याच्या अशुद्ध रक्तवाहिन्यामध्ये रक्त साजून राहते त्या अवायला डीप व्हेन थ्रॉम्ब्रोसिस म्हटले जाते ही अवस्था देखील पल्मोनरी एम्बोलिज्म असण्याची शक्यता असते. जर पापाच्या शिरांमध्ये साटलेल्या रक्ताच्या प्रवाहावर योग्य पद्धतीने उपचार करून नियंत्रित न कल्यास हे रक्त प्राणघातक ठरू शकते

**फुफ्फुसांचा कर्करोग:** फुफ्फुसांचा कर्करोग झाल्याने खोकल्यातून रक्त पडू शकते. जगभरात कर्करोगाचे सर्वाधिक रुग्ण हे फुफ्फुसाच्या कर्करोगाचे आहेत. या कर्करोगाचे महत्याचे कारण आहे मागने भूम्रपान, फुफ्फुसांच्या कर्करोगामध्ये पेशींची अनियंत्रित बाह होते त्याची सुरुवात अन्ननलिकेपासून होते आणि नतंर संपूर्ण फुफ्फुसात त्याची लागण होते.फुफ्फुसाच्या कर्करोगाची इतर लक्षणे म्हणजे श्वास घेताना शिट्टी वाजल्यासारखा अवाज होणे, खोकताना रक्त पडणे, किया तपकिरी रंगाची शंकी बाहेर पडणे, सतत निमोनिया होणे किंसा श्वास नलिकेत सूज येणे, संसर्गजन्य रोगांची लागण होणे, चेहरा, हात, मान आणि बोटे यांना सूज येणे, वजन घटणे आणि भूक सातत्याने कमी होणे

**क्षयरोग:** क्षयरोग हा संसर्गजन्य रोग आहे. जो जीवाणूंमुळे होतो. शरीराच्या सर्वच अवयवांमध्ये हा जीवाणु प्रवेश करू शकतो. अर्थात हा जीवाणू फुफ्फुसांमध्ये जास्त प्रमाणात असतो. या आजारामुळे खोकल्याबरोबरच रक्ा येण्याची समस्या दिसून येते, क्षयरोगाची इतरी काही लक्षणे असतात बसे तीन आठवड्यांपेक्षा अधिक खोकला, ताप (बहुतेक करून रात्री वाहणारा दाप), छातीत तीव्र वेदना, कफाबरोबर रखा पडणे, श्वास येण्यास त्रास, भूक कमी होणे इत्यादी

**पल्मोनरी एडीमा:** पल्मोनरी एडीमा हा देखील फुफ्फुसांशी निगडित गंभीर आजार आहे. त्यात फुफ्फुसात पाली होते. या रोगांमुळे खोकल्यातून रक्त पडते. पल्मोनरी एडीमा गा आजरात अनेकदा फुफ्फुसाबरोबर हृदयावरही परिणाम होतो. ही परिस्थिती गंभीर असते. या विकारात फुफ्फुसात हवे ऐवजी तरल पदार्थ भरतो त्यामुळे ऑक्सिजन रहात मिसव्द शकत नाही आणि ऑक्सिजनचे शरीरातील प्रमाण कमी होते.त्याच कारणामुळे स्क्णाला श्वास घेण्यास त्रास होती. पल्मोनरी एटीगा या विकाराची अजूनही काही लक्षणे आहेत जसे श्वसनास प्रास, छातीत वेदना, कफाबरोबर रक्त, अचानक दम लागणे, थोड्या कामानेही दमून जाणे, त्वचेचा रंग नीजा विवा काळवंडणे, रक्तदाब कमी होणे.

# २ रूपयात शेतातील गाजर गवत नष्ट करा, झायगोग्रामा भुंगे विक्रीसाठी उपलब्ध

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२ अमरावती.** गाजर गवताला नष्ट करणारे झायगोग्रामा (मेक्सिकन) भुंगे नाममात्र दरात शेतक-यांना उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांच्या माध्यमातून हे काम मागील ब-याच वर्षापासून सुरु आहे. तसेच शेतकऱ्यांचाही सदर भुंगे खरेदीस दरवर्षी मोठा प्रतिसाद मिळतो. यंदाही भुंगे खरेदीसाठी शेतकऱ्यांना आवाहन करण्यात आले आहे.

दरवर्षी प्रमाणे यंदाही वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या माध्यमातून हा उपक्रम ठेवण्यात आला आहे. कारण शेतकऱ्यांना गाजर गवताच्या नियंत्रणासाठी भुंगे प्रभावी माध्यम असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे गाजर गवतावर उपजीविका करून गाजर गवताला नष्ट करणारे झायगोग्रामा (मेक्सिकन) भुंगे सध्या विद्यापीठातील परोपजिवी कीटक संशोधन योजना,कीटकशास्त्र विभागात विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. यासाठी प्रती भुंगा रु. २ प्रमाणे विक्रीसाठी उपलब्ध आहेत. तर प्रती एकरी २०० व प्रती हेक्टरी ५०० या प्रमाणात भुंगे सोडावेत,




असे विभागाकडून सांगण्यात आले आहे.

दरम्यान ज्या शेतकऱ्यांना भुंगे खरेदी करावयाचे असल्यास त्यांनी नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी येथील परोपजिवी कीटक संशोधन योजना कीटकशास्त्र विभागातील अधिकारी जी.एस.खरात आणि डॉ.एस.एस.धुरगुडे यांना संपर्क करावा असे आवाहन करण्यात आले आहे. त्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांना याचा लाभ घ्यावा असे विद्यापीठाकडून सांगण्यात आले आहे.

### सर्वात प्रभावी माध्यम...

आपल्या देशात या गवतावर उपजिवीका करणा-या निरनिराळया २२ किडीची नोंद झालेली असली तरीही पाने खाणारा झायगोग्रामा भूंगा (झायगोग्रामा बायकोलोरॅटा) हे सर्वात प्रभावी माध्यम ठरले आहे. त्या अनुषंगाने गाजर गवताच्या नियंत्रणासाठी या भूंग्याचे प्रयोगशाळेत मोठया प्रमाणावर गुणन करुन नाममात्र दरात शेतक-यांना उपलब्ध करुन देण्याचे काम मागील ब-याच वर्षापासून सुरु आहे. मराठवाड्यासोबतच विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी ही मोठ्या प्रमाणात या भुग्यांसाठी मागणी करतात. तसेच शेतकऱ्यांनी विद्यापीठातून घेऊन आपल्या भागात सोडलेले भुंगे सध्या बऱ्याच भागात स्थिरावलेले दिसतात,

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. १२ ऑगस्ट २०२४ शहर/ग्रामिण


# लाभाच्या योजनांसाठी दोन अपत्यांची अट ठेवा

## खा. अनिल बोंडे यांची राज्यसभेत मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अमरावती–** केंद्र शासनाकडून राबविण्यात येणार्या गरीब कल्याण योजनेसह अन्य सर्व लाभाच्या योजनांसाठी इतर सगळ्या अटींसह दोन अपत्यांची अट (अपवाद दुसर्यावेळी झालेले जुळे अपत्य) त्यात ठेवण्यात यावी, अशी मागणी खा. डॉ. अनिल बोंडे यांनी राज्यसभेतून सरकारकडे केली आहे.

राज्यसभेच्या सभागृहात शुक्रवारी खा. बोंडे यांनी उपरोक्त मुद्दा मांडला. ते म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गरीब कल्याण योजना सुरू केली. या योजनेचे लाभार्थी ८० कोटी आहे. साडेचार कोटी कुटुंबांना घरे मिळाली आहे. कोट्यावधी कुटुंबांना शौचालये बांधून देण्यात आले आहे. आयुष्यमान योजनेसह अन्य योजनांचा लाभ जनतेला होत आहे. भारताची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. लोकसंख्येच्या नियंत्रणासाठी एका परिवारात दोन अपत्य असणे अपेक्षित आहे. पण, काही कुटुंबामध्ये दोन पेक्षा जास्त अपत्य आहेत. काही ठिकाणी तर ही संख्या ५ ते १० च्या दरम्यान आहे. त्यासाठी काही बंधन नाही. लोकसंख्या नियंत्रणाचा विचारही केला जात नाही.



अशा स्थितीत सर्व योजनांच्या पात्रतेसाठी दोन अपत्यांची अट (अपवाद दुसर्यावेळी झालेले जुळे अपत्य) ठेवणे आवश्यक आहे. धान्य देण्याच्या योजनेत कुटुंबातील प्रती व्यक्तीसाठी ५ किलो धान्य देण्यात येते. दोनपेक्षा जास्त अपत्य राहीले तर तेवढे जास्त धान्य द्यावे लागते. ही मुले मोठी झाली की त्यांचे वेगळे कुटुंब होते. कुटुंब जास्त झाले की प्रधानमंत्री आवास योजनेतून जास्त घरे बांधावी लागतात. हा एक प्रकारचा दोन अपत्यांना जन्म देणार्या सर्वसाधारण गरीब कुटुंबावर अन्यायच आहे. जो संविधान मानतो आणि देशाच्या हितासाठी दोन अपत्यांना जन्म देतो त्यांना कमी लाभ मिळतो. त्यामुळे दोन अपत्याचे कुटुंब असणार्यांनाच लाभाच्या योजनेसाठी पात्र ठरविण्यात यावे. खर्या अर्थाने होणार असल्याचे खा. बोंडे यांनी स्पष्ट केले. सभागृहातल्या सर्व सदस्यांनी माझ्या या मागणीचे समर्थन करावे, अशी विनंती देखील त्यांनी केली. केंद्र सरकार उपरोक्त मागणीवर काय निर्णय घेते याकडे सर्वांचे लक्ष राहणार आहे.–

# शिक्षक परिषदेची अमरावती विभागीय कार्यकारिणी गठित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अमरावती** –महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या जिल्हा कार्यकारिणीचे गठन करण्यात आले असून यामध्ये विभागीय अध्यक्षपदी धनराज कांदे तर महिला आघाडी अध्यक्षपदी वैशाली गरकल (घवळे) ' यांची निवड करण्यात आली आहे. जिल्हाध्यक्षपदी रवी घवळे यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे.शिक्षकांच्या समस्या सोडविण्यासाठी तसेच त्यांच्या न्याय हक्कासाठी नेहमीच झटणारी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद सर्वपरिचित आहे या परिषदेची राज्य








कार्यकारिणीची बैठक नुकतीच संभाजीनगर येथे संपन्न झाली. संभाजी नगर येथे संपन्न झालेल्या अधिकृत महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या प्रांत कार्यकारणी बैठकीमध्ये अमरावती जिल्ह्याकरिता अधिकृत कार्यकारणी घोषित करण्यात आली. यामध्ये अमरावती विभागीय अध्यक्ष पदी धनराज कांदे, जिल्हाध्यक्ष पदी रवि घवळे जिल्हाकार्यध्यक्ष पदी विजय जावरकर, जिल्हाकार्यवाह पदी खुशाल गुल्हाने तसेच महिला आघाडीच्या अध्यक्षपदी वैशाली गरकल (घवळे), कार्याध्यक्षपदी वर्षा भांदर्गे , कार्यवाहपदी ज्योती सानप यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.निवड झालेले पदाधिकारी लवकरच आपापली आघाडी तसेच जिल्हा कार्यकारणी व तालुका कार्यकारणीचे गठन करतील. निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# चिखलदऱ्यात ढग उतरले जमिनीवर

## मनमोहक दृश्य आल्हादायक वातावरणात पर्यटकांची गर्दी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अमरावती–** विदर्भाचे नंदनवन असलेल्या चिखलदरा पर्यटनस्थळावर दोन दिवसांपासून पावसाने दमदार हजेरी लावत नंदनवन ओलेचिंब करून सोडले. सुखावह असा हा पाऊस जबरदस्त बरसला.पाऊस ओसरल्यानंतर चिखलदऱ्याचे मनमोहक दृश्य अगदी आल्हादायक होते जणू ढग जमिनीवर उतरले असा नजारा दिसत आहे



गेल्या चार दिवसांपासून विश्रांती घेतलेल्या पावसाने शनिवार सकाळ पासूनच संपूर्ण अमरावती जिल्ह्यात दमदार हजेरी लावत जोरदार आगमन केले. चिखलदरा येथे हि पावसाने जोरदार हजेरी लावल्याने इथले वातावरण आल्हादायक झाले आहे चिखलदर्याचे वैशिष्ट असलेला भिमकुंड धबधबा ओसंडून वाहत आहे चोहीकडे हिरवळ आहे अश्यातच ढग सुद्धा जमिनीवर उतरल्याचा भास पर्यटकांना होत आहे आज रविवार असल्या कारणाने पर्यटकांची तुफान गर्दी चिखलदऱ्यात पहावयास मिळाली.

**प्रत्येक पॉईंटवर गर्दी:** चिखलदरा येथे असणारे हरिकेन पॉईंट, भीम कुंड, स्कायवाक पॉईंट, गाविलगड किल्ला, देवी पॉईंट अशा सर्वच महत्त्वाच्या पॉईंट्सवर पर्यटकांची प्रचंड गर्दी उसळली आहे. विशेष म्हणजे, रविवारी पहाटे हातभराच्या अंतरावर असणारा माणूस देखील ओळखता येणार नाही इतके प्रचंड धुके चिखलदऱ्यावर पसरले होते. या धुक्यात फिरण्याचा आनंद अनेक पर्यटकांनी लुटला. या धुक्यांमुळे चिखलदरा येथे निर्माण होत असणाऱ्या देशातील सर्वांत मोठ्या स्कायवॉकचे पिल्लर देखील गुडूप झालेत. आता संपूर्ण पावसाळ्यावर चिखलदराचे वातावरण असेच अतिशय बहरदार राहणार आहे. १५ ऑगस्टला दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील चिखलदरा येथे पाय ठेवायला देखील जागा नसणार, अशीच परिस्थिती राहणार आहे. स्वातंत्र्य दिनाच्या सुट्टीनिमित्त चिखलदरा येथील सर्व हॉटेल, स्टे होम, एमटीडीसीचे रेस्ट हाऊस सारे काही आधीच आरक्षित झाले आहे.

# जिल्ह्यात सात महिन्यात तब्बल १७४ शेतकऱ्यांनी लावला फास

## मार्च महिन्यात सर्वात जास्त ३७ आत्महत्या

## शेतकरी आत्महत्यांच्या निकषानुसार ४९ पात्र तर १०२ चौकशीकरिता प्रलंबित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अमरावती–**

जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्यांचे सत्र सुरूच असून मागील काही वर्षात शेतकऱ्यांनी आपली जीवनयात्रा संपविण्याच्या घटनेत वाढ झाली आहे. सततची नापिकी, कर्ज, पावसाचा खंड, अतिवृष्टी यामुळे पिकांचे उत्पादन कमी होण्याची भीती तसेच शासनाचे उदासीन धोरण या सारख्या कारणांचे परिणाम आता जाणवू लागले आहेत. जिल्ह्यात १ जानेवारी २०२४ पासून ३१ जुलै २०२४ दरम्यान तब्बल १७४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. यामध्ये शेतकरी आत्महत्यांच्या निकषानुसार ४९ पात्र तर १०२ चौकशी करीता प्रलंबित आहेत. तसेच २३ आत्महत्या अपात्र ठरविण्यात आल्या आहेत. शासनाने शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी पावले उचलावी. अशी मागणी आता होत आहे.जिल्ह्यात नैसर्गिक आपत्तीमुळे पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. शेतमालाच्या उत्पादनात घट झाली. शेतीचा वाढलेला खर्च, शेतीसाठी घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीची चिंता, खते व कीटकनाशकांसाठी येणारा अतिरिक्त खर्च, शेतमालाला योग्य भाव न मिळणे, मुलांचे शिक्षण इत्यादी कारणांमुळे यामुळे शेतकरी तणावात आलेला आहेत. यामुळे शेतकऱ्यांकडे कोणताही दुसरा पर्याय राहत नाही. त्यामुळे शेवटी आत्महत्ये सारखे टोकाचे पाऊल उचलण्यात भाग पडतो. जिल्ह्यात सात महिन्यात तब्बल १७४ शेतकऱ्यांनी गळ्याला फास लागून आपली जीवनयात्रा संपविली असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. यामध्ये एकूण प्रकरणापैकी ४९ शेतकऱ्यांच्या आत्महत्या पात्र ठरविण्यात आल्या आहे. तसेच २३ आत्महत्या अपात्र तर १०२ चौकशी करिता प्रलंबित ठेवण्यात आलेल्या आहेत. तर ४९ पात्र शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना मदत देण्यात आल्याचा दावा, शासन प्रशासनाकडून करण्यात आला आहे.

### आत्महत्येची ही आहेत कारणे...

शेतमालाला जाहीर केलेला आधारभूत किंमत कधीच मिळत नाही. परिणामी, पिकावर केलेला खर्चही निघत नसल्याने शेतकरी कर्जबाजारी होत आहे. त्यामुळे मुलींचे शिक्षण, आरोग्य खर्च, लग्न, उदरनिर्वाह, सावकार, बँकेचे कर्ज कसे फेडणार या विवंचनेतून शेतकरी आत्महत्या होत आहेत.




### मार्च महिन्यात सर्वाधिक आत्महत्या

जिल्ह्यात मार्च महिन्यात मोठ्या प्रमाणात शेतकरी आत्महत्या झाल्या आहेत. रब्बी पिकांचे नुकसान, कर्ज, कुटुंबाचा गाडा कसा हाकणार ? या विवंचनेतून याच महिन्यात सर्वाधिक ३७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. यापैकी १३ कुटुंबीयांना मदत देण्यात आली असल्याचे आकडेवारी सांगते. १३ प्रकरणे प्रलंबित तर ११ अपात्र ठरविण्यात आल्या आहे.

### सात महिन्यात जिल्हाभरातील आत्महत्या

| महिना | प्रकरणे, | पात्र, | अपात्र, | प्रलंबित, |
|---|---|---|---|---|
| जाने. | २४ | १० | ३ | ११ |
| फेब्रू. | २८ | १४ | ४ | १० |
| मार्च | ३७ | १३ | ११ | १३ |
| एप्री. | २४ | १० | १ | १३ |
| मे | २३ | १ | ४ | १८ |
| जून | १९ | १ | ० | १८ |
| जुलै | १९ | ० | ० | १९ |

### सरकारी उपाययोजना कागदावरच

शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी शासनाकडून विविध उपाययोजना राबविण्यात येत असल्या तरी त्याची अंमलबजावणी केवळ कागदावरच होत आहे. पीककर्ज वाटप, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीची मदत, शासकीय योजनांचा थेट लाभ आदींची अंमलबजावणीही योग्य रीतीने केल्यास आत्महत्या रोखण्यास प्रतिबंध करता येणार आहे. मात्र, तसे होत नाही, ते वास्तव आहे.

**प्रविण मोहोड** जिल्हाध्यक्ष, स्वाभिमानी शेतकरी संघटना

# सावधान ! पोहरा, चिरोडीच्या जंगलात वाघाचे आगमन, शिवारात दिसताच शेतकऱ्यांनी ठोकली धुम

## वनविभागाने घटनास्थळाहून घेतले पंजाचे ठसे, पावसाळ्यात कागदावर सुचना चिपकविण्याचा प्रताप

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अमरावती–**शहरा पासून ८ किमी अंतरावर असलेल्या पोहरा व चिरोडीच्या जंगलातील शेतशिवारात काही शेतकऱ्यांना वाघ दिसल्याने त्यांनी तेथून पळ काढला. याबाबत माहिती मिळताच चांदुर रेल्वे वन विभागाने तातडीने घटनास्थळ गाठून वाघाच्या पंज्याचे ठसे घेतले. परंतु, सावधान बाबतच्या सुचनांचे मजबूत फलक न उभारता वनविभागाच्या संबंधित कर्मचाऱ्यांनी सतत पाऊस सुरू असताना देखील साधा एफोर पेपवर प्रिन्ट आऊट काढून लोखंडीफलकावर चिपकविण्याचा महाप्रताप केल्याने सर्वत्र आर्श्वय व्यक्त होत आहे.

अमरावती शहरातील वडाळी, एसआरपीफ कॅम्प परिसरापासून सुमारे ८ किमी अंतरावर पोहरा व चिरोडी हे बरेच मोठे घनदाट जंगल आहे. पोहरा जंगलात जुने वाघामाय मंदिर आहे. त्या भागात कधीकाळी वाघांचा समुह राहत असल्याने त्या मंदिराला वाघामाय मंदिर असे नाव पडले. असे असले तरी गेल्या तीन, चार दशकांपासून पोहरा, चिरोडीच्या जंगलामध्ये वाघ दिसल्याची नोंद नाही. या दोन्ही घटनाट जंगलांमध्ये १२ ते १६ बिबट असल्याची नोंद वन विभागात आहे. यासाठीच पोहरा ते चिरोडी दरम्यानच्या जंगलामध्ये वन विभागाने मिनिसफारी सुरू केली होती. अशातच १० ऑगष्ट रोजी काही शेतकरी पोहरा वचिरोडी जंगलील शिवारातील आपआपल्या शेतात जात असताना त्यांना वाघाचे दर्शन झाल्याने त्यांनी तातडीने गावाकडे पळकाढला. याबाबत चर्चेला उधान आल्याने चांदुर रेल्वे वनविभागा पर्यंत माहिती गेली. माहिती मिळताच वन विभागाच्या पथकाने तातडीने जंगलात शोध घेतला असता पथकाला बऱ्याच ठिकाणी वाघाच्या पंज्याचे ठसे आढळल्याने अधिकारी, कर्मचाऱ्यांनी पंचनामा करून ठशांचे नमूने गोळा केले. पोहरा, चिरोडी जंगलात वाघाचे आगमन झाल्याने लगतच्या सर्व गावांमध्ये, मुख्य रस्त्यावर, जंगलामध्ये ठिकठिकाणी लोकांना सावधान, या जंगलामध्ये वाघ, बिबटचा संचार आहे, असे



मजबूत फलत लावणे गजरेचे होते. परंतु, वनविभागाच्या काही अतिहुशार अधिकारी, कर्मचाऱ्यांनी वाघाबाबत सावधानतेचा मजकूर एफोर साईजच्या पेपरवर प्रिन्टआऊट काढून मुख्य रस्त्यावर तसेच जंगलात व गावालगत असलेल्यावनविभागाच्यालोखंडी फलकावर चिपकविल्या. त्यामुळे त्या सुचनेकडे कुणाचे लक्ष जात नसल्याने पोहराव चिरोडीच्या जंगलात वाघाचा संचार सुरूझाला आहे, हे लोकांना तसेच आजूबाजूच्या गावातील शेतकऱ्यांना कळत नाही. वाघाच्या संचारापासून अनभिज्ञ असलेले शेतकरी बिनधास्त शेतात जात असल्याने कोणतीही अप्रिय घटना होण्याची दाट शक्यता असल्याचे बोलले जात आहे.

# मेळघाटात सागवान तस्करी उघड

## आंतरराज्यीय टोळी गजाआड

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अमरावती–** मेळघाटातील सूसर्दा वनपरिक्षेत्रात सागवान तस्करी शनिवारी उघड झाली आहे. या प्रकरणी आंतरराज्यीय टोळीतील पाच जणांना ताब्यात घेण्यात आले असून फरार तीन आरोपींचा शोध सुरू आहे. सुसर्दा वनपरिक्षेत्रातील बिबामल वर्तुळात अवैध वृक्षतोड व अवैध वाहतूक प्रकरणात भारतीय वनअधिनियम अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या राखीव वनखंडात सागवान तस्करांच्या टोळीने अवैध मार्गाने प्रवेश करुन सागवान झाडे तोडली. या



लाकडाची मध्यप्रदेश राज्यातील बर्हाणपूर येथे तस्करी करण्यात आली आहे. तपासादरम्यान अवैध वाहतूक करण्यासाठी वापरण्यात आलेली तीन वाहने जप्त करण्यात आली आहेत. या वनगुन्ह्यातील आरोपी सचिन भागसिंग पटोरकर (रा. बिबामल), चेतन चंपालाल जावरे (रा. खारी), सरताप दशरथ भामर (रा. भवर) नुकदार भवरसिंघ अहिर्या (रा. भवर, राधे मोरे (रा. घाकबारा, मध्यप्रदेश) यांना अटक करण्यात आली आहे. दुनियासिंघ मोरेय (रा. चाकबारा), महेश पासि (रा. बाटा), अंकित पासि (रा. चाकबारा) हे तीन आरोपी फरार झाले असून त्यांचा शोध सुरू आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी सचिन भागसिंग पटोरकर याला धारणी येथील प्रथम श्रेणी न्यायालयाने येत्या २२ ऑगस्ट पर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. ही कारवाई मेळघाट प्रादेशिक वनविभागाचे उपवनसंरक्षक अग्रिम सैनी यांच्या मार्गदर्शनात वनपरिक्षेत्र अधिकारी आयुष कृष्णा, वन परिक्षेत्र अधिकारी पी. जी. सातारकर आणि पथकाने केली आहे.

# वरूड तालुक्यात संत्रा व मोसंबीची गळती

## ६० टक्के फळे पडली खाली -बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अमरावती** विदर्भाच्या कॅलिफोर्नियातील संत्रा व मोसंबी फळबागांवर बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव झाल्याने या भागांमधील ६० टक्के फळे जमिनदोस्त झाल्याने शेतकर्यांचे कोट्यावधी रुपयांचे नुकसान झाल्याची भीती व्यक्त होत आहे. बागांवरील फळे झपाट्याने खाली आल्याने सर्वत्र हाहाकार उडाला आहे. संत्रा बागा ६० टक्के गळतीने उत्पादक शेतकरी दहशती खाली आल्याने सरकारने मदतीचा हात द्यावा, अशी मागणी तालुक्यातुन होत आहे.

मोसंबी व संत्रा गळतीने शेतकरी भेदरला असून झाडावर फळे राहतील की नाही या



चिंतेत आहे. अज्ञात बुरशीने गेल्या ७२ तासात होत्याचे नव्हते झाले असून बागात मालच विक्री साठी उपलब्ध नाही. वरुड तालुक्यात २९ हजार हेक्टरवर मोसंबी, संत्रा लागवडीखाली आहे. तालुक्यात गेल्या पंधरा दिवसापासून ढगाळ वातावरण आहे. वातावरणाने अज्ञात बुरशीची लागण झाली आहे. पर्यायाने संत्रा, मोसंबीची अतोनात गळ झाली आहे. अजूनही ती सुरूच आहे. प्रचंड मेहनतीने फुलवलेल्या बागेतील फळे डोळ्या देखत टपटप गळत असून ती गळ काही केल्या थांबत नसल्याने महागडी बुरशीनाशके निषप्रभ्र ठरली आहे. गेल्या फेब्रुवारी ते मे महिन्यात आलेल्या गारपीटीने संत्राबागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. फळांना गारीचा मार लागला होता. त्यातून बचावलेली फळे आता अज्ञात बुरशीजन्य रोगांना बळी पडु लागली आहे.

# खंडणी कमी दिल्याने महिलेच्या घरावर सशस्त्र हल्ला

## ८ गुंडांनी सिनेस्टाईल माजविली दहशत, अंगणातील दुचाकीची तोडफोड, परिसरातील नागरिकांना तलवारीचा धाक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अमरावती–** पोलिस रेकार्डवरील कुख्यात हिट्रीशीटर आरोपीने आठ जणांसह मिळून खंडणी कमी दिली म्हणून रात्रीच्या सुमारास एका महिलेच्या घरावर तलवार, लोखंडी रॉडसह हल्ला केला. महिलेच्या घरातील सामानाची तोडफोड करून अंगणातील दुचाकीची तोडफोड केली. परिसरातील नागरिक महिलेच्या मदतीसाठी जमले असता दंगलखोरांनी जमावाला सुध्दा तलवारीचा धाक दाखवून त्यांच्यामध्ये दहशत निर्माण झाली. फ्रेजपुरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील बिच्छु टेकडी परिसरात ही धक्कादायक घटना घडली.

शेख जुबेर शेख इक्बाल, शेख अयान शेख इक्बाल, दोन्ही रा. राहुल नगर, शेख जुबेर शेख मियाजउद्दीन, रा. चमन छावणी, शेख फैजान शेख कलीम, शेख नावेद शेख जावेद, शेख आवेद शेख जावेद, चंदन खुशाल गडलींग, अयान शहा जमीर शहा, सर्व. रा. बिच्छु टेकडी, अमरावती अशी गुन्हे दाखल झालेल्या आरोपींची नावे माहितीनुसार, आहेत. तक्रारकर्त्या महिलेचे बिच्छु टेकडी परिसरात किराणा दुकान आहे. मुख्य आरोपी शेख जुबेर हा फ्रेजरपुरा पोलिसांच्या रेकार्डवरील कुख्यात आरोपी असून तो बिच्छू टेकडी परिसरात गुंडागिरी करित असल्याचे त्याची दहशत आहे. १४ जुलै रोजी ईदच्या दिवशी आरोपी शेख जुबेर हा महिलेच्या किराणा दुकानात आला आणिपार्टी करण्यासाठी महिलेला ५ हजार रूपयाची खंडणी मागितली. तसेच पैसे न दिल्या दुकान चालू देणार नाही, अशी धमकी सुध्दा दिली. जुबेरची दहशत असल्याने महिलेने त्याला २ हजार रूपये दिले. परंतु, उर्वरित ४ हजार रूपयांसाठी जुबेर नेहमी महिलेच्या दुकानासमोर राडा करून महिलेवर दबाव आणत होता. अशातच १० ऑगष्ट रोजी रात्री महिला मुली व नातवांसोबत घरात बसले असताना शेख जुबेर अन्य सात आरोपींसह महिलेच्या घरात शिरला. सर्वांच्या हातात तलवार, लोखंडी रॉड, पाईप होते. आरोपींनी पैसे दिले नाही म्हणून महिलेच्या घरातील सामानांची तोडफोड केली. होहल्ला करित अंगणातीलमोपेड दुचाकीची तोडफोड केली. परिसरातील नागरिक धाऊन आले असता आरोपींनी त्यांना सुध्दा तलवारीचा धाक दाखविल्याने नागरिक पळून गेले. याबाबत कुणीतरी डायल ११२वर फोनकेला. पोलिसांची गाडी दुरून दिसल्याने सर्व आरोपी फरार झाले. याबाबत फ्रेजरपुरा पोलिसांनी महिलेच्या तक्रारीवरून शेख जुबेरसह ८ आरोपींवर गुन्हे दाखल केले असून पोलिसांनी आरोपींची शोधामेहिम सुरू केली आहे.–



फ्रेजरपुरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील घटना

# विदर्भातील धरणांमधील पाणीसाठा ६९ टक्क्यांवर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२ अमरावती : –** राज्यातील पावसाचा जोर काहीसा ओसरला, तरी विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरू आहे. सिंचन प्रकल्पांच्या पाणलोट क्षेत्रांमध्येही चांगला पाऊस झाल्याने जलसाठ्यात वाढ झाली आहे. सध्या विदर्भातील ६ मोठ्या प्रकल्पांमधून विसर्ग सुरू आहे. विदर्भात एकूण २६ मोठे प्रकल्प आहेत. त्यापैकी अमरावती जिल्ह्यातील उर्ध्व वर्धा, यवतमाळ जिल्ह्यातील बेंबळा, नागपूर जिल्ह्यातील पेंच तोतलाडोह, गोंदिया जिल्ह्यातील इटियाडोह, भंडारा ' जिल्ह्यातील गोसीखुर्द, आणि वर्धा जिल्ह्यातील

निम्न वर्धा प्रकल्पातून विसर्ग सुरू आहे. वैनगंगा, वर्धा आणि बेंबळा नदीकाठच्या गावांना प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे. नागपूर

### सहा मोठ्या प्रकल्पामधून विसर्ग सुरू

विभागातील मोठ्या प्रकल्पांमध्ये ७४.११ टक्के, तर अमरावती विभागातील प्रकल्पांमध्ये ६०.१२ टक्के पाणीसाठा झाला आहे. सध्या पावसाचा जोर कमी झाला असून, हलक्या सरी कोसळत आहेत. पुढील तीन–चार दिवसदेखील असा पाऊस राहण्याचा अंदाज आहे. विदर्भातील भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, नागपूर गडचिरोली जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ढगांच्या गडगडाटसहहलक्या ते मध्यम पावसाच्या सरी कोसळण्याचा अंदाज हवामानशास्त्र विभागाने दिला आहे.

विदर्भातील सर्वच प्रकल्पांच्या पाणलोट क्षेत्रात दमदार पाऊस झाल्याने धरणसाठ्यात वाढ झाली. अप्पर वर्धा धरणात १६.३७ टीएमसी (८३.७० टक्के) पाणीसाठा झाला आहे. धरणाच्या पाणलोट क्षेत्रात आतापर्यंत ५४० मिमी पाऊस झाला आहे. या धरणातून २४ क्यूमेक विसर्गसुरू आहे. बेंबळा प्रकल्पात ३.१८ टीएमसी (४८.९१ टक्के) पाणीसाठा झाला आहे. या धरणातून ८४ क्यूमेक पाणी सोडण्यात येत आहे. या प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात गेल्या १ जूनपासून ६५४ मिमी पावसाची नोंद झाली आहे. पेंच तोतलाडोह प्रकल्पात ३२.१४ टीएमसी (८९.५१ टक्के) पाणीसाठा झाला असून ६३.३७ क्यूमेक विसर्ग सुरू आहे.

इटियाडोह प्रकल्पात ११.२३ टीएमसी (१०० टक्के) पाणीसाठा झाला असून ७४.३८ क्यमेक विसर्ग सुरू आहे. गोसीखुर्द प्रकल्पात १०.७७ टीएमसी (४१.१९ टक्के) पाणीसाठा झाला आहे,



### इतर मोठ्या प्रकल्पांमधील पाणीसाठा :

अरूणावती ३.४० टीएमसी (५६.८३ टक्के), काटेपूर्णा २.६४ टीएमसी (८६.६६ टक्के), वान १.७२ टीएमसी (५९.४६ टक्के), पेनटाकळी ०.३५ टीएमसी (१६.६६ टक्के), बाघ–शिरपूर ४.६५ टीएमसी (८२.३४ टक्के), इरई ४.५९ टीएमसी (८५.२४ टक्के)

# विभागीय आयुक्तांकडून शेगाव येथील अतिक्रमणाची पाहणी



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२ बुलडाणा–** शेगाव येथील अतिक्रमणाची विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय यांनी आज पाहणी केली. शेगाव येथील पालखीच्या पार्श्वभूमीवर ही पाहणी करण्यात आली. शेगाव शहरात दरवर्षीप्रमाणे श्री गजानन महाराजांच्या पालखीचे पंढरपूर येथून आगमन झाले. शेगाव येथे पालखी आल्यावर शहरात श्रींचा पालखी सोहळा उत्सव साजरा करण्यात येतो. त्यानुसार दि.११ ऑगस्ट रोजी पालखी पोहचली. त्याअनुषंगाने श्री गजानन महाराज मंदिराच्या पालखी सोहळ्याची पूर्वतयारी करण्यात आली.

गेल्या दोन दिवस शेगाव शहरात नगर परिषद कर्मचारी तसेच पोलीस प्रशासनासमवेत अतिक्रमण हटाव मोहिम राबविण्यात आली. शहरातील रेल्वे स्टेशन ते श्री गजानन महाराज मंदिर परिसरामधील अतिक्रमण हटवून शेगावात येणाऱ्या भाविक भक्तांसाठी रस्ता मोकळा करुन देण्यात आला.तसेच पालखीच्या दिवशी अतिक्रमण होऊ नये यासाठी अतिक्रमण मोहिम राबविण्यात आली. शेगाव शहरातील साफसफाईची कामे जलतगतीने स्वच्छ करण्याची कामे नगर परिषदमार्फत करण्यात आलीत.विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, उपविभागीय अधिकारी रामेश्वर पुरी, खामगाव, मुख्याधिकारी जयश्री काटकर यांनी श्री गजानन महाराज संस्थान सभोवतालच्या परिसराची पाहणी केली. त्यानंतर श्री गजानन महाराज संस्थामध्ये असलेल्या पोलिस मदत कक्षाला भेट दिली.यावेळी पालखी मार्गाची पाहणी करण्यात आली.पाहणीनंतर नगर परिषदेमार्फत गांधी चौक येथे माझी वसुंधरा अंतर्गत आयोजित सार्वजनिक जनजागृती कार्यक्रमाला भेट दिली. जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी श्री गजानन वाटिका येथे वारकरी शिक्षण संस्था येथे जाऊन पालखीचे दर्शन घेतले.

# महिला दक्षता समितीची कार्यशाळा



## सायबर, बालक व महिला गुन्ह्यांवर लक्ष केंद्रित

## पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी केले मार्गदर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अमरावती**सायबर युगातील महिला, बालक यांना येणाऱ्या अडचणी आणि त्यांच्या संबंधित गुन्हे व प्रतिबंधात्मक उपायोजनांच्या अनुषंगाने शहर स्तरावर महिला दक्षता समितीच्या बैठका घेण्यात येत असून ९ ऑगस्ट रोजी वसंत हॉल येथे घेण्यात आलेल्या बैठकीत उपस्थित महिलांच्या समस्या जाणून घेऊन पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले.

९ ऑगस्ट रोजी वसंत हॉल येथील बैठकीत सायबर युगातील महिला, बालक यांना येणाऱ्या अडचणी, त्यांच्या सबंधी होणारे अपराध व प्रतिबंधात्मक उपायोजना या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत तज्ज्ञ मंडळींमार्फत प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर मार्गदर्शन करण्यात आले.

पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांच्या अध्यक्षेतेखाली शहर स्तरावरील महिला दक्षता समितीच्या बैठकी घेण्यात येत आहेत. या अनुषंगाने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाकरिता प्रमुख वक्ते ज्योती खानपासोळे यांनी महिला व बालकांसबंधित नविन कायद्यातील तरतुदीची माहिती दिली. जिल्हा सामान्य रुग्णालयातील वैद्यकिय अधिकारी डॉ. प्रिती मोरे यांनी महिलांच्याआरोग्याविषयक माहिती देऊन, महिलांनी – स्तनाचा कॅन्सर कसा ओळखावा याबाबत – मार्गदर्शन केले.सायबर पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक अनिकेत कासार यांनी उपस्थित पदाधिकारी व महिलांना तसेच बालकांविषयीचे सायबर गुन्ह्यांची माहिती देऊन, त्यांना अलर्ट केले. सदर कार्यक्रमाचे मुख्य अतिथी पोलीस उपायुक्त कल्पना बारवकर, गणेश शिंदे, सागर पाटील तसेच पोलीस काका–दिदी पथकातील पोलीस निरीक्षक सिमा दाताळकर, रेखा लोंढे, स्वाती पवार, विजया पंधरे, सोनाली मेश्राम उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे संचालन, प्रास्ताविक पोलीस निरीक्षक दिप्ती ब्राम्हणे यांनी केले. आभार भरोसा सेलच्या पोलीस उपनिरीक्षक सुषमा आठवले यांनी मानले.

# वाहन दरीत कोसळल्याने चार जण गंभीर जखमी

## नवनीत राणांनी रूग्णवाहिका बोलावून रूग्णालयात पाठविले, तत्पूर्वी राणांनी केला जखमींवर प्राथमिक उपचार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अमरावती –** धारणी तालुक्यातील मांग्या गावाजवळ एक वाहन धारणी पुलावरूनदरीत कोसळल्यानेचार जण जखमी अवस्थेत कसेबसे रस्त्यावर आले. धारणी तालुक्यात आभार दौऱ्यावर असलेल्या माजी खासदार नवनीत राणांना याबाबत कळताच नवनीत राणांनी तातडीने घटनास्थळ गाठून रूग्णांना पाणी पाजले, गाडीतील फस्टेड बॉक्समधून प्राथमिक उपचार केले. तसेच रूग्णवाहिका बोलावून सर्व जखमींना तातडीने रूग्णालयात दाखल केले.

रक्षाबंधनापूर्वी संपूर्ण मेळघाटात फिरून नवनीत राणाने आदिवासींचे आभार मानतांना संवाद साधला. अपघाती कार मांगरू व सेमाडोह मार्गावरील एका पुलाखाली दरीतकोसळलेले होते. कारमधील चारही युवक चांगलेच जखमी झालेले होते. ते रक्तबंबाळ अवस्थेत कसेबसे रस्त्यावर येऊन पडून राहिले. याबाबत माहिती मिळताच नवनीत राणांनी तातडीने घटनास्थळ गाठले. मेळघाटची बेटी असलेल्या नवनीतने तातडीने त्यांच्या वाहनातील लोकांच्या



मदतीने जखमींची मदत करून माहेरचे कर्ज काहीअंशी फेडले असल्याचे बोलले जात आहे. आपल्या हाताने नवनीत राणांनी जखमी युवकांना पाणी पाजुन त्यांची तहाण भागविली. घटना शनिवार रात्री ११ चे सुमारासची असून बोलावलेली रूग्णवाहिका पोहचल्यावरच नवनीत राणा यांनी रुग्णांना दवाखान्यात पाठविल्या नंतर घटनास्थळवरून रवाना झाल्यात. त्यांचे सोबतच्या युवकांनी सुध्दा भरपुर मदत केली. आपल्या आभार दौऱ्यातनवनीत राणा आणि आ. रवि राणा यांनी आदिवासींचे आभार मानतांना रिटर्न गिफट म्हणून साड्या, बस्ते वितरित केले. मात्र परतत असताना रूग्णांची मदत करीत एक आगळावेगळा तोहफा दिला ची चचा होत आहे. सर्व रूग्णांना मदत वेळेवर मिळाल्याने ते सर्व सध्या धोक्या बाहेर आहेत.

# स्व. माँ साहेब मीनाताई ठाकरे स्त्री शक्ती सन्मान पुरस्कार उत्साहात

## कर्तृत्ववान महिलांना ' स्त्रीशक्ती सन्मान पुरस्कार' प्रदान

### सर्वच स्तरावरून शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांचे कौतुक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अमरावती–**

आपल्या कार्यकर्तृत्वाने महिला सक्षमीकरणाची मोहीम बळकट करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा शिवसेना उबाठा गटाकडून भव्यदिव्य कार्यक्रमात स्वर्गीय माँ साहेब मीनाताई ठाकरे स्मृती स्त्री शक्ती सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात आला.शिवसेना ऊबाठा गटाचे जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते व् हे आयोजन अतिशय उत्कृष्ट असल्याचे पाहून उपस्थितांनी सुनील खराटे यांचे कौतुक कृत अभिनंदन केले.

संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनात शनिवारी सायंकाळी पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. माजी पालकमंत्री यशोमती ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या भव्यदिव्य पुरस्कार वितरण सोहळ्यास शिवसेनेच्या सुषमा अंधारे तसेच शिवसेना नेते खासदार अरविंद सावंत यांची प्रमुख उपस्थिती होती. यासोबतच प्रमुख पाहुणे म्हणून माजी खासदार अनंत गुढे, राष्ट्रवादीचे नेते व श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, माजी आमदार प्रदीप वडनेरे, शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख सुधीरभाऊ सूर्यवंशी, शिवसेना महिला आघाडी संपर्क




प्रमुख सागरताई पुरी, माजी आमदार धाने, प्रतिभा बोपशेट्टी, कांचन ठाकूर, जिल्हाप्रमुख श्याम – देशमुख, मनोज कडू, महानगरप्रमुख पराग गुडदे, ज्योती अवघड, वर्षा भोयर, मनीषाटेंबरे, प्रीतीबंड, लक्ष्मी शर्मा, राजश्री जटाळे, सौं मराठे, प्रशांत वानखडे, भारत चौधरी, राजेंद्र तायडे, ललित झंझाड, जयश्री कुहेकर अर्चना धामणे आदी उपस्थित होते.

### या नारीशक्तीचा झाला सन्मान

या सोहळ्यात हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या सचिव डॉ. माधुरी चेंडके, शैक्षणिक क्षेत्रात प्रसिद्ध दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्षा कीर्तीताई अर्जुन, प्रसिद्ध उद्योजिका व समाजसेविका उज्वलाताई हावरे, पीडित महिलांसाठी झटणाऱ्या समाजसेविका, लेखक व रजियाताई सुलताना, वैद्यकीय क्षेत्रासोबतच सामाजिक क्षेत्रात कार्यरत डॉ. रंजनाताई बनारसे, असंख्य निराधार वृद्धांचे पालकत्व स्वीकारणाऱ्या सुख शांती वृद्धाश्रमाच्या संचालिका श्रीमती सुमनताई रेखाते, महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा मंदाकिनीताई निमकर आणि दिशा संस्थेच्या संचालिका ॲड. ज्योतीताई खांडपासोळे यांचा स्व. माँसाहेब मीनाताई ठाकरे स्मृती स्त्री शक्ती सन्मान पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. मानचिन्ह, पैठणी व पुष्पगुच्छ असे पुरस्काराचे स्वरूप होते. सोबतच पद्माताई घरडे, शीतल पुंड, ज्योतीताई कहाळे, अनुष्का बेलकर, शुभदा मेटकर यांचा देखील विशेष पुरस्कार देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींचा सत्कार कार्यक्रमाचे औचित्य साधून अमरावतीचे खासदार बळवंतभाऊ वानखडे, शिवसेना नेते व दक्षिण मुंबईचे खासदार अरविदजी सावंत, यवतमाळ – वाशिमचे खासदार संजयभाऊ देशमुख, वर्धेचे खासदार अमर भाऊ काळे या नवनिर्वाचित खासदारांचा सत्कार उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

# जरांगे मुख्यमंत्री झाले, तरीही सग्यासोयऱ्यांना आरक्षण नाही

## खा. डॉ. अनिल बोंडेंच्या विधानाने खळबळ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती ३**

राज्यात मराठा ओबीसी आरक्षणावरून रान पेटलेले असतानाच मनोज जरांगे मुख्यमंत्री झाले, तरीही सग्यासोयऱ्यांना मराठा आरक्षण मिळणार नाही. कोणी तशा वल्गनाही करू नये, असा हल्लाबोल भाजपचे नेते तथा खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी येथे केला.

अमरावती येथील भाजप कार्यालयात रविवारी जिल्हा ओबीसी मोर्चाच्या बैठकीत ते प्रमुख पाहुणेम्हणून बोलत होते. खा. बोंडे यांनी मराठा आरक्षणावरून मनोज जरांगे यांना पुन्हा डिवचल्याने एकच खळबळ उडाली आहे. रक्ताचे नाते असलेल्या सगळ्यांना कुणबी प्रमाणपत्र मिळणारच असून ते ओबीसीमध्ये येणार आहेत. पण, सग्यासोयऱ्यांना ते कदापीही मिळणार नाही, कारण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेले संविधान सर्वश्रेष्ठ आहे. त्यामुळे आरक्षणाबाबत कोणीही तशा वल्गना करू नये, तसेच समाजात फूट पाडण्याचे काम जरांगे यांनी करू नये. यामध्ये सगळ्यात जास्त नुकसान हे मराठा समाजाचे होईल, अशी पुष्टीही खा. डॉ. अनिल बोंडे यांनी जोडली.

# आठ मतदार संघात काँग्रेसकडे ३८ इच्छुक पण तिकीट कोणाला मिळणार?


## दर्यापुरात सर्वाधिक १३ उमेदवार इच्छुक : जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांची माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसच्या वतीने जिल्ह्यातील मतदारसंघनिहाय इच्छुक उमेदवारांचे अर्ज मागविण्यात आले होते. त्या अंतर्गत आठ मतदासंघासाठी ३८ इच्छुक उमेदवारांनी काँग्रेसकडे अर्ज दाखल केले आहेत. त्यामध्ये दर्यापूर मतदारसंघासाठी सर्वाधिक १३ उमेदवारांचे अर्ज दाखल झाल्याची माहिती जिल्हाध्यक्ष बबलूदेशमुख यांनी दिली.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्ष सक्रिय झाले आहेत. त्या अनुषंगाने जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीनेसुद्धा ११ जुलैपासून इच्छुक उमेदवारांचे अर्ज मागविण्यात आले होते. याकरिता त्यांच्याकडून पक्ष शुल्कदेखील स्वीकारण्यात आले.

त्या अंतर्गत जिल्ह्यातील आठ विधानसभा मतदारसंघारखठी इच्छुक एकूण ३८ उमेदवारांनी अर्ज दाखल केलेले आहेत, यामध्ये तिवसा मतदारसंघातून विद्यमान आमदार व काँग्रेस नेत्या ॲड, यशोमती ठाकूर, अचलपूर



मतदारसंघातून जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख तर धामणगाव रेल्वेमतदारसंघातून माजी आमदार प्रा. वीरेंद्र जगताप यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. यासह दर्यापूर मतदारसंघातून रामेश्वर अभ्यंकर, गुणवंत देवपारे, सुधाकर तलवारे, विजय जोंधळेकर, अरुण वानखडे, अमित मेश्राम, विजय विल्हेकर, रमेश साबळे, सागर कलाने, चंद्रशेखर खंडारे, आशा अधम, नितेश वानखडे, प्रवीण मनोहर, मेळघाट मतदारसंघातून दयाराम काळे, हेमंत चिमोटे, रविकुमार पटेल, राम चव्हाण, मन्ना दारसिबे, रमेश तोटे, वरूड-मोर्शी मतदारसंघामधून गिरीश कराळे व हेमंत सोनारे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. अमरावती मतदारसंघातून डॉ. सुनील देशमुख, शहराध्यक्ष बबलू शेखावत, माजी महापौर विलास इंगोले, विश्वास देशमुख, सचिन हिवसे, ॲड. शोएब खान व नजीरभाई यांनी मागणी केली आहे. तसेच बडनेरा मतदारसंघातून ॲड दिलीप एडतकर, पंकज मेश्राम, किशोर बोरकर, नितीन कदम, मुन्ना राठोड व संदेश सिंघई या सहा इच्छुकांनी अर्ज दाखल केले आहे, लवकरच या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती होणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख व शहराध्यक्ष बबलू शेखावत यांनी दिली.

# जिल्ह्यातील २९ शिक्षकांचे 'आदर्श शिक्षक'साठी प्रस्ताव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अचलपूर**

जिल्ह्यातील १४ पंचायत समित्यांमधील १४ आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी २९ शिक्षक रांगेत आहेत. त्याकरिता २९ जुलै रोजी या शिक्षकांच्या मुलाखती घेण्यात आल्या अहेत.

२०२३-२४ या वर्षासाठी जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी शिक्षण विभाग जि. प. अमरावतीकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्या अनुषंगाने जिल्ह्यातील १४ पंचायत समित्यांमधील २९ शिक्षकांनी प्रस्ताव सादर केले. शिक्षकांना आदर्श ठरविण्यासाठी १०० गुण ठरविण्यात आले. त्यापैकी ८० गुण मुलाखत आणि २० गुण शाळेतील शिक्षकांचे शैक्षणिक काम यासाठी होते. २० गुणांसाठी ४ सदस्यीय पथक जिल्हास्तरावरून संबंधित शाळेत दाखल झाले. सदर पथकाने संबंधित शिक्षकांच्या शैक्षणिक कार्याचे मूल्यमापन केले. त्याअनुषंगाने पथक संबंधित शिक्षकांना गुणदान करणार आहेत. ज्या शिक्षकाला जादा गुण मिळेल तो शिक्षक आदर्श ठरणार आहे. सदर मूल्यांकन करण्यासाठी विविध पंचायत समितीमधील १२ गटशिक्षणाधिकारी, १६ शिक्षण विस्तार अधिकारी, २६ केंद्रप्रमुख आणि ५८ कर्मचारी यांना नियुक्तकरण्यात आले होते.सदर पथकाने शिक्षकांच्या विविध कामांचे २० गुणाकरिता मूल्यमापन केले. मूल्यमापन करीत असताना योग्य मूल्यमापन होत नसल्याची कुजबूज शिक्षकांमध्ये आहे. दीपक कोक्तारे गटशिक्षणाधिकारी भातकुली हे तपासणी पथकाचे प्रमुख होते. परंतु, ते अचलपूरमध्ये आलेच नाहीत. दुसरे केंद्रप्रमुख विजय देशमुख उशिराने दाखल झाले. अनिल कोल्हे यांनी काम पाहिले असल्याचे समजते. या संदर्भात कोक्तारे यांच्याशी फोनवर संपर्क साधला मात्र त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

# भाव खाऊन जात आहे 'काटवल' नावाची रानभाजी : दोनशे ते तीनशे रुपये प्रति किलो

**विक्सर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

सध्या भाजीपाल्याचे दर आकाशाला भिडले आहेत. त्यामुळे सामान्य माणसाला भाजीपाला विकत घेणे परवडेनासे झाले आहे. अशावेळी ग्रामीण भागात आढळणारी 'काटवल' ही रानभाजी चांगलाच भाव खाऊन जात आहे. खेड्यापाड्यात शेतकरी शेतावर गेले की, शेतातूनच भाजीपुरते काटवल आणून काटवलाच्या रसरशीत भाजीवर ताव मारत आहेत.

कारल्याशी साधर्म्य असणारी काटवल ही रानभाजी कारल्यासारखीच वेलवर्गीय आहे. वेगवेगळ्या भागांत या काटवलांना वेगवेगळी नावे



आहेत. मात्र, अचलपूर,मेळघाट तालुक्यात या रानभाजीला काटूल या नावानेच ओळखले जाते. आता काही ठिकाणी या रानभाजीचे व्यावसायिक तत्त्वावर उत्पादन घेण्यात येत असले, तरी या उत्पादित काटवलांपेक्षा शेतात आणि रानात नैसर्गिकरीत्या उगवलेल्या वेलांमधून जे काटवल मिळतात, त्या काटवलांना ग्राहकांची व खवय्यांची मोठी पसंती असते. उल्लेखनीय असे की, शेतकरी या काटवलाची लागवडकरीत नाही. पाऊस पडला की, ते आपोआप उगवतात. काटवलाची वेल साधारणतः पावसाळ्यात चांगला पाऊस पडल्यानंतर त्याच्या कंदांमधून उगवते. एका महिन्यात ती फुलावर येते आणि फळधारणेस सुरुवात होते. सात आठ दिवसांत काटवल फळ चांगल्या मोठ्या लिंबाएवढ्या आकाराचा झाला की, तो खाण्यासाठी योग्य समजूनतोडल्या जाते. अनेक आजारांवर गुणकारी म्हणून काटवलाच्या भाजीचे सेवन केले जाते. अनेक शहरी बाबू आपल्या खेड्यातील नातलगांना मुद्दाम सांगावा पाठवून पावसाळ्यात काटवल मागवून घेत असतात. नागभीड येथे मोठ्या प्रमाणावर नसले, तरी काही प्रमाणात हे काटवल विक्रीसाठी ठेवलेले दिसून येत असतात.

### तणनाशकामुळे काटवल होतेय दुर्मीळ

पावसाळ्यात शेतातील बांधावर, काटेरी झुडपात काटवल हमखास दिसून येतात, मात्र तणनाशक औषधांमुळे काटवल आता दुर्मीळ होत चालली आहे. काटवल शोधण्यासाठी ग्रामीण भागातील नागरिक जंगलात जातात. बाजारात याची मोठी मागणी असल्याने अनेक जण याला विक्रीसाठी बाजारात नेत असतात. सध्या दोनशे ते तीनशे रुपये किलो बाजारात रानातील काटवल विकले जातात. मात्र, शेतात केल्या जाणाऱ्या तणनाशक फवारणीमुळे काटवल बांधावर आता दुर्मीळ होत चालले आहे. तणनाशक औषधांमुळे काटवलांच्या वेल मृत पावत आहेत.

# धारणीच्या केकदाखेडात वाघाने केली बैलाची शिकार

## दररोज ऐकायला येते वाघाची डरकाळी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२धारणी**

धारणी तालुक्यातील मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे अकोट वन्यजीव विभागातील केकदाखो गावालगतच्या जंगलातून दररोज वाघ गावाकडे येत असल्याने आदिवासी फार घाबरलेले आहेत. दरम्यान वाघाने एका बैलाची शिकार केली आहे. गावापर्यंत सध्या कोणतेच वाहन पोहचू शकत नसल्याने मोठी घटना घडल्यास जनहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

धारणीपासून २० कि.मी अंतरावरील केकदाखेडा या धुळघाट रेल्वे




रेंजमधीलगावाजनीकच्या सालार पाटना नावाच्या जंगलात वाघाचा मुक्त संचार आहे. गेल्या आठवड्यात सुभाष छगन चौहान याचा बैलाची या वाघाने शिकार केल्यानंतर वाघ सतत गावाजवळ डरकाडी फोडत असल्याने ग्रामस्थांनी सांगितलेले आहे. एका माहितीनुसार, वनखंड क्रमांक ५३ किंवा ६४ भागत वाघ फिरत आहे. गरोदर माता व कुपोषित बालकांना दवाखान्यापर्यंत येण्या-जाण्यासाठीचे सर्व रस्ते बंद पडलेले आहेत. नाल्यावर रपटे आणि गावपोच मार्ग बांधकाम झालेला नसल्याने नदीतूनआदिवासींना कवठाझिरी अथवा खिडकी पर्यंत जावे लागते. पंचायत समिती धारणीला अनेकवेळी स्मरणपत्रेव ठराव दिल्यानंतर गावाचा रस्ता, सौरबल्ब आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आलेली नाही. तर आता वाघाच्या संचारामुळे दहशत पसरलेली आहे.

# ढाकणा रेंजच्या जंगलात गुराख्यावर केला अस्वलीने हल्ला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२ अमरावती**

जंगलात हरविलेली गाय शोधण्यासाठी गेलेल्या आदिवासी व्यक्तीवर अस्वलीने हल्ला करून त्याला गंभीर जखमी केले. विशेष म्हणजे जखमीने सुध्दा तेवढयाच ताकदीने अस्वलीचा प्रतिकार सुध्दा केला. धारणी तालुक्यातील ढाकणा रेंजच्या जंगलामध्ये ही घटना घडली. या घटनेची चर्चा व्हायरल होताच सावर्याबोरीखेड गावातील आदिवासींमध्ये चांगलेच भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

सुरजलाल दादू धांडे (४८) असे गंभीर जखमी झालेल्या आदिवासी व्यक्तीचे नाव आहे. माहितीनुसार, सुरजलाल रविवारी ११ ऑगष्ट रोजी सुर्योदय होण्यापूर्वी जंगलामध्ये हरविलेली गाय शोधायला गेले होते. परंतु, अचानक नकलागडा जवळच्या जंगलात एका अस्वलीने सुरज यांच्यावर जबर हल्ला करून त्यांना जखमी केल्याने सावर्या व बोरीखेडा गावात एकच दहशत निर्माण झालेली आहे. सुरजलाल यांना बिजुधावडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केल्यानंतर त्यांना धारणी उपजिल्हा रूग्णालयात रेफर करण्यात आले. हरविलेल्या



गायीला शोधण्यासाठी बोरीखेडा परिमंडळातील सावर्या गावाजवळच्या जंगलात गेला होता. नकला गड्डाच्या नालजोडवर उभा असताना सरुजलालवर अचानक धिप्पाड अस्वलीने हल्ला केला. घाबरलेल्या सुरजलालनेसुध्दा प्रतिकार करून अस्वलीला हाकलून लावले. बर्याच संघर्षानंतर सुरजलाल रक्तबंबाळ होऊन जबर जखमी झाला. सावर्या येथील चंद्रभान पाटील, तिलक व दिपक शनवारे यांनी जखमी सुरजलालला आपल्या गाडीने बिजुधावडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले. अर्धा तासातच रूग्णवाहिका आल्याने तात्काळ रूग्णालयात भरती करण्यात आले. डॉ. बालाजी डुकरे, डॉ. समीर खान, धीरज इंगळे, अभिजित भागवत, दिपक पाटीलव्रप्रवीणसोलेकर यांनी तातडीने वैद्यकीय सेवा उपलब्ध केली. जखमी सुरजलालला धारणी उपजिल्हा रूग्णालयात दाखल करण्यात आले व तेथून तात्काळ अमरावती पाठविण्यात आले. रेंजर दत्ता पवार आणि वनपाल खडके यांनी तात्काळ आर्थिक सहाय्यता प्राप्त केली. प्रकरण वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविण्यात आलेले आहे. गुगामल वन्यजीव विभागातील ढाकणा वनपरिक्षेत्रात वाघ, बिबट, अस्वल, चांदी अस्वल, रान डुक्कर सारखे मासांहारी प्राणी असल्याने नागरिकांवर नेहमी प्राणघातक हल्ला होत असतो. जंगलात प्रवेश करूनये, अशी विनंती रेंजर पवार यांनी केलेली आहे.

# राजकमल चौकातील स्पॉवर पोलिसांची धाड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती :**

राजकमल चौक ते राजापेठ रस्त्यावरील एका स्पावर सिटी कोतवाली पोलिसांनी रविवारी सायंकाळी धाड टाकली. तेथून स्पा भागीदारासह तीन तरूण व तीन तरुणींना ताब्यात घेण्यात आले. तेथे मसाजच्या आड देहविक्रीचा व्यवसाय व तरूणाईचे अश्लिल चाळे सुरू असल्याची तक्रार सिटी कोतवाली पोलिसांकडे करण्यात आली होती.

त्या स्पामध्ये मसाजच्या आड अन्य गोरखधंदा सुरू असल्याने तेथीलरहिवाशांनी एका माजी नगरसेवकाला त्याबाबत माहिती दिली. त्या नगरसेवकाने त्या स्पामध्ये शिरत तेथील सहमालकासह अन्य जणांना तंबी दिली. त्यानंतर सिटी कोतवालीचे ठाणेदार मनोहर कोटनाके यांना माहिती दिली. पोलिसांनी तेथून चार तरूण व तीन तरूणींना ताब्यात घेतल्याची माहिती आहे. वृत्त लिहिस्तोवर पंचनामा सुरू होता. माजी नगरसेविका लविना हर्षे यांनी देखील घटनास्थळ गाठून त्या अवैध धंद्याबाबत संताप व्यक्त केला.

# अप्पर वर्धा धरणाचे ११ दरवाजे ४०सेंटीमीटरने उघडले



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२ अमरावती**

पश्चिम विदर्भातील सर्वात मोठे धरण असलेल्या अप्पर वर्धा धरणाचे १३ पैकी ११ दारे ४०सेंटीमीटरने उघडले आहेत. त्यामुळे पर्यटकांमध्ये उत्साह संचारल्याचे दिसत आहे. धरण ८०टक्के भरले आहे. धरणाचा विसर्ग ७१६ क्युमेक एवढा नदीपात्रात सोडण्यात येत आहे. वर्धा नदीचे पाणलोट क्षेत्र मध्य प्रदेशात आहे. धरणाच्या पाणलोट क्षेत्रात अधिक पाऊस झाला. मध्य प्रदेशातून वाहत येणाऱ्या जाम, माडू नदिला मोठ्या प्रमाणात पुर आल्याने गेल्या दोन तीन दिवसांत जलाशयाच्या साठ्यात प्रचंड वाढ झालेली आहे. हवामान खात्याच्या विभागाने अमरावती जिल्ह्यात तसेच अप्पर वर्धा धरणाच्या परिसरात तीन ते चार दिवस जोरदार पाऊस कोसळण्याचा इशारा दिला आहे. यामुळे अप्पर वर्धा धरणातील गावांना देखील सतर्ककरण्यात आले आहे.सोमवारी दुपारी ४ वाजताच्या सुमारास हे दरवाजे उघडण्यात आले आहे.

# तुषार भारतीय मित्र परिवारातर्फे आयोजित' स्वर मल्हार 'शास्त्रीय व उपशास्त्रीय संगीत मैफल संपन्न

## पंडित प्रसाद खापर्डे यांच्या सुरेल गायकीने अवघे सभागृह मंत्रमुग्ध

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२ अमरावती**

शास्त्रीय संगीत म्हणजे सूर आणि लयीचा मिलाप. मनाच्या कॅनव्हासवर उमटणाऱ्या अमूर्त भावनांना अभिव्यक्त करण्यासाठी शास्त्रीय संगीत हे उत्तम साधन आहे. रसिक असणाऱ्या अमरावतीकरांच्या मनाला तर शास्त्रीय संगीतामुळे नेहमीच उभारी मिळते. पंडित प्रसाद खापर्डे यांनी संत ज्ञानेश्वर सभागृहात सादर केलेल्या शास्त्रीय संगीताची मैफल विलक्षण रंगली. श्रोत्यांचे कान




त्यामुळे तृप्त झाले.

गुरुकुल बहुउद्देशीय शिक्षण संस्था व तुषार भारतीय मित्र परिवार तर्फे स्वरमल्हार शास्त्रीय व उपशास्त्रीय संगीत मैफिलीचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्राचे प्रसिध्द गायक पंडित प्रसाद खापर्डे यांच्या सुरेल गायकीने अवघे सभागृह मंत्रमुग्ध केले . या संगीत मैफिल मध्ये साथ संगत तबला श्री मयंक बेडेकर , हार्मोनियम वर श्री श्रीकांत पिसे , सारंगी वर उ फारुख लतीफ खान तर तंबोरावर विवेक राठोड , विक्रम बोके यांनी केले.

यावेळी स्वर मल्हार या कार्यक्रमाच्या आयोजना बाबतची भूमिका कार्यक्रमाचे मुख्य आयोजक भाजपा नेते तुषार भारतीय यांनी आपल्या प्रास्ताविकेमधून मांडले . यावेळी कार्यक्रमाचे संचलन मंदार नानोटी तर प्रमुख कलाकारांचा परिचय अमरावतीचे प्रसिद्ध निवेदक नितीन भट तर आभार प्रदर्शन गजानन कोल्हे यांनी केले. कार्यक्रमाला अमरावती मधील रसिक व तरुण वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होता.

# स्वातंत्र्यदिन होणार जुन्याच गणवेशावर कापड आले पण शिवायचे कधी ?

## शिक्षण विभागाच्या कारभाराचा विद्यार्थ्यांना फटका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२ अमरावती**

समग्र शिक्षा अभियान अंतर्गत पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना गणवेश उपलब्ध करून दिले जाते. यावर्षी पहिल्यांदाच शासन स्तरावरून कापड पुरविले जाणार आहे. मात्र, कापड पुरविण्यास उशीर झाला असल्याने विद्यार्थ्यांचे गणवेश शिवून झाले नाही. परिणामी विद्यार्थ्यांना यावर्षीचा स्वातंत्र्य दिन जुन्याच गणवेशावर करावा लागणार आहे.



मागील वर्षीपर्यंत विद्यार्थ्यांच्या गणवेशाचे पैसे शाळा व्यवस्थापन समितीच्या बँक खात्यावर जमा केले जात होते. शाळा व्यवस्थापन समिती स्थानिक स्तरावर गणवेश खरेदी करून स्वातंत्र्यदिनाच्या पर्वी त्याचे वितरणकरत होते. त्यामुळे स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी सर्वच विद्यार्थी नवीन गणवेश व बुटात दिसून येत होते. यावर्षी मात्र शासनाकडून गणवेशाचे कापड पुरविले जाण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, गणवेशाचे कापड पुरविण्यास अत्यंत उशीर झाला.

जेमतेम चार दिवसांपूर्वी गणवेशाचे कापड उपलब्ध झाले आहे. सदर कापड स्थानिक महिला बचत गटांमार्फत शिवून शाळेला उपलब्ध करून द्यायचे आहेत. मात्र, यासाठी पुन्हा १५ दिवसांचा कालावधी लागू शकते. त्यामुळे स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वी गणवेश मिळणे कठीण होणार आहे. काही विद्यार्थ्यांनी शासकीय गणवेश न मिळाल्याने पदरमोड केली. त्यामुळे पालकांनाही आर्थिक झळ सोसावी लागली आहे.

### कापडाच्या दर्जाबाबतही पालकांत नाराजी

स्थानिक स्तरावर शाळा व्यवस्थापन समिती गणवेश खरेदी करीत होती. शाळा व्यवस्थापन समितीमध्ये मुख्याध्यापक, शिक्षक व पालक यांचा समावेश राहत होता. शाळा आपल्याला आवडेल तसा गणवेश खरेदी करत होते.

कधी–कधी गणवेशाचा रंगसुद्धा बदलला जात होता. इंग्रजी माध्यमाच्या शाळांप्रमाणे काही जिल्हा परिषद शाळांचे गणवेश राहत होते. आता मात्र शासनाकडून कापड पुरविले जाणार आहे. सदर कापड कसे राहणार याबाबत शाळा समितीच्या सदस्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत.

## विधानसभा निवडणुकीच्या मैदानात कुणाला उतरवायचं; फडणवीस करणार शिक्कामोर्तब

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२मुंबई**

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर भाजप नेतृत्वाने राज्यात सर्व जबाबदारी देवेंद्र फडणवीसांवर सोबवल्याची चर्चा आहे. विधानसभा निवडणुकीसाठी मित्रपक्षांसोबत जागावाटपाचा निर्णय स्वत: देवेंद्र फडणवीस त्यांच्या पातळीवर घेणार असल्याचं भाजपच्या एका ज्येष्ठ नेत्याने सांगितल आहे. येत्या काही महिन्यांत होणाऱ्या विधानसभा निवडणुका सुरळीत पार पडाव्या, या हेतूने हे पाऊल उचलल्याचे भाजपकडून सांगण्यात आले आहे.



विधानसभेसाठी भाजपकडून देवेंद्र फडणवीस यांना जागा निश्चितीचे अधिकार देण्यात आले असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. तर मित्रपक्षांना किती जागा द्यायच्या याचे सर्व अधिकारही भाजपकडून देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आल्याचं सूत्रांकडून मिळालेल्या माहितीतून समोर येत आहे. भाजपच्या कोअर कमिटीची एक बैठक पार पडली. या कोअर कमिटीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असल्याचं सांगितय.भाजपने घेतलेल्या निर्णयानंतर आता महायुतीत भाजपने किती जागा लढवायच्या याचा निर्णय देवेंद्र फडणवीस यांना घेता येणार आहे. यासोबत मित्रपक्षांना किती जागा द्यायच्या हे ठरवण्याचे सर्वाधिकार देवेंद्र फडणवीसांना सोपवले आहे.

# अमरावती शिक्षण अधिकारी कार्यालयात वाढला भ्रष्टाचार

## शेखर भोयर यांची थेट शिक्षणमंत्र्यांकडे तक्रार




**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२ अमरावती**

संतांची भूमी व शिक्षण क्षेत्रात भरारी घेणारे शहर म्हणून सध्या अमरावती शहराची ओळख निर्माण होत आहे. मात्र अमरावती शिक्षण अधिकारी कार्यालयात फार मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार वाढला असून शिक्षकांचे दैनंदिन कामकाजा करता सुद्धा चिरीमिरी दिल्या शिवाय कोणतेही काम होत नाही हे विशेष या बाबतच्या अनेक तक्रारी शिक्षक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष शेखर भोयर यांच्या कडे आल्या असुन या बाबत थेट राज्याचे शिक्षणमंत्री यांच्याकडे नुकतीच लेखी तक्रार करण्यात आली आहे .



अमरावती शिक्षण अधिकारी कार्यालयात फार मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार वाढला असून संच मान्यता, खाते मान्यता, वरिष्ठ निवड श्रेणीचे प्रकरणे, सेवा ज्येष्ठते नुसार मुख्याध्यापक पदा ला मान्यता देणे तसेच मेडिकल बिल या दैनंदिन कामासाठी मोठ्या प्रमाणात पैशांची मागणी कार्यालयातून केली जाते अश्या प्रकारे बऱ्याच शिक्षकांच्या तक्रारी आमच्या संघटनेला प्राप्त झालेल्या असून सदर बाब अतिशय गंबिर आहे यामुळे शासनाची प्रतिमा देखील मलिन होत आहे.मात्र प्रतिमा जरी मलीन होत असली तरी याचा फारसा फरक शिक्षण अधिकारी कार्यालयातीळ कर्मचाऱ्यांवर पडत नसून अनेक शिक्षक मात्र चांगलेच त्रस्त झालेले आहेत. अश्या कर्मचाऱ्यांवर आता राज्याचे शिक्षणमंत्री दीपक केसरकर काय कारवाई करतात हे बघणे औसुक्याचे ठरणार आहे.



निवडणुकीच्या काळात साडी चोळी शिक्षकांना वाटून निवडून येणार आमदार यांचे या कडे अजिबात लक्ष नाही शिक्षण विभागात गेल्या चार वर्षांपासून प्रचंड भ्रस्टाचार वाढलेला आहे अगदी छोट्या छोट्या कामांसाठी पैसे द्यावे लागतात तरच कामे होतात हे दुर्देव आहे मला तर वाटते कि काही दिवसांनंतर या ठिकाणी प्रत्येक कामाचे किती पैसे लागतात याचे रेट बोर्ड तर नाही लागणार ना ? आपण या संदर्भाबाबत राज्याचे शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्या कडे रीतसर तक्रार केली आहे.

**शेखर भोयर, शिक्षक महासंघ संस्थापक अध्यक्ष**

# रिक्त जागा व अपुऱ्या यंत्रसामग्रीचा ठपका ठेवत अमरावतीच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास चालू वर्षात मान्यता नाही

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२ अमरावती**

राज्य सरकारने राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यामध्ये अमरावतीसह दहा वैद्यकीय महाविद्यालये सुरू करण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते. रिक्त जागा व अपुऱ्या यंत्रसामग्रीचा ठपका ठेवत अमरावतीच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास चालू वर्षात मान्यता नाकारण्यात आल्याने आता नव्याने मंजुरीसाठी प्रतीक्षा करावी लागणार आहे. दुसरीकडे, वैद्यकीय महाविद्यालयाच्या जागेचाही तिढा कायम आहे. राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने राज्यात केलेल्या तपासणीनंतर आठ वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये त्रुटी आढळल्याने त्यांची मान्यता लांबणीवर पडली आहे. त्यात अमरावतीच्या महाविद्यालयाचाही समावेश आहे.

गेल्या महिन्यात राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाकडून या वैद्यकीय महाविद्यालयांची तपासणी करण्यात आली. यामध्ये प्रत्यक्ष पाहणीमध्ये प्राध्यापक, पायाभूत सुविधा आणि उपकरणांची उपलब्धता यांची तपासणी करण्यात आली. त्यानंतर ऑनलाइन संवाद साधण्यात आला होता. यात काही महाविद्यालयांना आवश्यक बाबींची पूर्तता करण्यात अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले.



प्रस्तावित महाविद्यालयांपैकी अनेक महाविद्यालयांच्या इमारतींचे काम अपूर्ण आहे. प्राध्यापक, वसतिगृहे, पुस्तके, फर्निचर आणि उपकरणे आणि ग्रंथालये उपलब्ध नसणे, शिक्षक नियुक्त नसणे, बायोमेट्रिक्स बसवले नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले आहे. अमरावतीचे महाविद्यालय तूर्तास जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या नवीन इमारतीमध्ये सुरू होणार होते, पण प्राध्यापकांच्या कमतरतेचा मुद्दा प्रकर्षाने समोर आला. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना मंजुरी नाकारल्याच्या निर्णयाच्या विरोधात अपिल केले जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी कोंडेश्वर नजीकच्या अलियाबाद (वडद) येथील जागा निवडण्यात आली असली, तरी आमदार सुलभा खोडके यांनी या जागेला विरोध दर्शवला आहे. प्रस्तावित जागा ही शहरापासून १५ किलोमीटर अंतरावर असल्याने विद्यार्थी आणि रुग्णांसाठीदेखील ती गैरसोयीची असल्याचे त्यांनी म्हटले आहे. दुसरीकडे, अलियाबाद (वडद) येथेच वैद्यकीय महाविद्यालयाची इमारत उभारली जाणार असल्याचा दावा आमदार रवी राणा यांनी केला आहे. ही जमीन बडनेरा मतदारसंघातील असल्याने या जागेसाठी ते आग्रही आहेत.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या श्रेय आणि जागेसाठी भांडण करण्यापेक्षा हे महाविद्यालय लवकरात लवकर कसे सुरू होऊ शकेल, यासाठी लोकप्रतिनिधींनी प्रयत्न करायला हवेत. अधिकारी, कर्मचारी वर्ग आणि इतर सुविधांसाठी सरकारकडे पाठपुरावा करायला हवा.

# भांबोरा -अमदाबाद रस्ता : पुलाचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याची ग्रामस्थांची तक्रार



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२ तिवसा**

तिवसा तालुक्यातील भांबोरा अहमदाबाद रस्ता गेल्या कित्येक वर्षांनंतर तालुक्यातील भांबोरा ते अमदाबाद या रस्त्यावर पुलाचे निर्माण कार्य सुरू आहे.परंतु या निर्माण कार्यात कंत्राटदाराने निकृष्ट दर्जाची परिसीमा गाठली असून या बांधकामात सिमेंट ऐवजी मातीमिश्रीत करण्यात आली असल्याने खरंच पुलाची निर्मिती होत आहे की आमच्या मृत्युचा सापळा असा संतप्त सवाल येथील नागरिकांकडून करण्यात येत आहे. रस्ते, ईमारती व पुल विकासाचे पहिले पाऊल या शासनाच्या ब्रिदवाक्याला पुर्णपणे छेद दिल्या जात असुन याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग डोळेझाक करीत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.अंदाजपत्रकात नमुद करण्यात आल्याप्रमाणे कोणतेही बांधकाम साहित्य या बांधकामात वापरण्यात आले नाही.त्यामुळे पुलाच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे.१.५० कोटी रुपयांच्या या कामात पुर्णपणे घोळ असुन बांधकामात वापरण्यात येणारे साहित्य अतिशय निकृष्ट दर्जाचे आहे.अमदाबाद गावाला जोडणारा हा पुल येथील नागरिक व विद्यार्थ्यांसाठी एकमेव दळणवळणाचा मार्ग आहे. परंतु या मार्गात निर्माण करण्यात येत असलेला पुलच नागरिकांच्या जीवावर उठणारा ठरणार आहे.तेव्हा पुलाचे काम पुर्णत्वास जाण्याआधी आतापर्यंत करण्यात आलेल्या कामाची सखोल चौकशी करण्यात यावी अशा मागणीचे निवेदन येथील नागरिकांकडून बांधकाम विभागाला देण्यात आले आहे.तसेच शासनाच्या डोळ्यात धुळफेक करून नियमबाह्य पद्धतीने काम करणाऱ्या कंत्राटदाराचा परवाना रद्द करून कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकण्यात यावे अशी मागणी जोर धरू लागली आहे.

भिंती पाडण्याचे आदेश दिले.पुलाच्या दोन्ही बाजूला बांधण्यात आलेल्या भिंती मातीमिश्रीत साहित्य वापरून उभ्या करण्यात आल्याने त्याचे पुनर्निर्माण करण्याचे आदेश देण्यात आले आहे.

**विनोद बोरसे,**
**उपविभागीय अभियंता,**
**बांधकाम विभाग,**
**तिवसा.**

पुलाच्या निकृष्ट बांधकामाबाबत कंत्राटदाराला विचारणा केली असता त्यांनी उडवा उडवी ची उत्तर देऊन दमदाटी केली वर तुम्ही कुठेही तक्रार केली तरी माझं काहीहि वाकडं होणार नाही.

**प्रफुल डोंगरे नागरिक**
**बॉक्सर**

### स्त्याची लागली वाट

कंत्राटदाराच्या जड वाहतुकीमुळे अमदाबाद रस्त्याची पुर्णतः वाट लागली आहे.पुर्वी याच रस्त्यावरून भरधाव वाहने धावत होती.परंतु सध्या पायी चालणेही कठीण झाले आहे.

# रेल्वेच्या 'मेगा ब्लॉक'मुळे अनेक गाड्या रद्द : प्रवाश्यांना बसतोय मोठा फटका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अमरावती**

रेल्वेचे तांत्रिक कार्य मोठ्या प्रमाणात केले जात असल्याने त्याचा मोठा फटका प्रवाशांना बसत आहे. नागपूर विभागातील चांदूर रेल्वे आणि भुसावळ विभागातील वाघळी स्थानकावर 'नॉन इंटरलॉकिंग' कार्यामुळे अनेक गाड्यांच्या फेऱ्या रद्द करण्यात आल्या आहेत, तर काही गाड्यांच्या वेळेत बदल आहे.

नागपूर विभागातील चांदुर रेल्वे स्थानक येथे अप लूप लाईनच्या विस्तार कार्यासाठी 'पॉवर' आणि 'ट्रॅफिक ब्लॉक' घेण्यात आला आहे. 'नॉन–इंटरलॉकिंग ब्लॉक' कार्यामुळे प्रवासी गाड्यांच्या फेऱ्या रद्द करण्यात आल्या आहेत. गाडी क्रमांक ११११२१ भुसावळ – वर्धा मेमू १२ ऑगस्ट रोजी रद्द, ११११२२ वर्धा – भुसावळ मेमू १३ ऑगस्टला रद्द, गाडी क्रमांक १२११९ अमरावती – अजनी एक्सप्रेस व गाडी क्रमांक १२१२० अजनी – अमरावती एक्सप्रेस १३ ऑगस्ट रद्द, गाडी क्रमांक ०१३७१ अमरावती – वर्धा मेमू १३ ऑगस्ट रोजी रद्द, ०१३७२ वर्धा – अमरावती मेमू १४ ऑगस्ट व गाडी क्रमांक ०१३७४ अमरावती – वर्धा मेमू १४ ऑगस्ट रोजी रद्द करण्यात आली आहे.



भुसावळ विभागातील वाघळी स्थानक येथे मनमाड – जळगांव तिसरी मार्गिकासाठी 'यार्ड रिमोडूलिंग'साठी 'नॉन कार्य इंटरलॉकिंग' करण्यात येत आहेत. या कार्यामुळे प्रवासी गाड्यामध्ये १२ ऑगस्ट रोजी बदल करण्यात आला आहे. २२१२२ लखनौ – लोकमान्य टिळक टर्मिनस एक्सप्रेस ०१ तास १५ मिनिटे, १५०१८ गोरखपूर – लोकमान्य टिळक टर्मिनस एक्सप्रेस ४० मिनिटे, ०५२९० पुणे – मुजफ्फरपुर विशेष दोन तास, १२१७१ लोकमान्य टिळक टर्मिनस –हरिद्वार एक्सप्रेस ०१ तास ४५ मिनिटे, १४३१३ लोकमान्य टिळक टर्मिनस – बरेली एक्सप्रेस ०१ तास ३० मिनिटे, २२६९० यशवंतपूर – अहमदाबाद एक्सप्रेस एक तास व १२५३४ मुंबई –लखनउ पुष्पक एक्सप्रेस एक तासाने नियमित करण्यात येणार आहे. म्हणजेच तेवढा वेळेने संबंधित गाडी उशिराने धावेल. वेळेत गाडी स्थानकावर पोहोचली तरी ती थांबवून ठेवण्यात येणार आहे, अशी माहिती रेल्वे प्रशासनाकडून देण्यात आली.

रेल्वे प्रशासनाकडून विविध मार्गावर मोठ्या प्रमाणात तांत्रिक कार्य केले जात आहे. त्यामुळे या महिन्यांत विविध गाड्यांच्या फेऱ्या ऐनवेळी रद्द करण्यात आल्या, काही गाड्यांच्या वेळेत, स्थानकात किंवा मार्गात बदल करण्यात आले. रेल्वेच्या 'मेगा ब्लॉक'मुळे प्रवाशांना चांगलाच मनस्तापाचा सामना करावा लागत आहे. रेल्वे प्रवाशांनी सहकार्य करण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले.

# अंशतः अनुदानित शिक्षकांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा

## राज्य सरकारचा निषेध करीत केले मुंडन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अमरावती**

अशंतः अनुदानित शाळा कॉलेजला दि. ०१ जानेवारी २०२४ पासुन वाढीव टप्पा अनुदान दयावे याबाबत तात्काळ शासन आदेश काळावा त्रूटी पुर्तता केलेल्या सर्व शाळा तुकडयांना समान टप्पा अनुदान दयावे. पुणे स्थरावरील सर्व शाळा तुकडयांना अनुदान दयावे. अशतः अनुदानित शिक्षकांना पेन्शन योजना लागू करावी. १०० टक्के अनुदानित शिक्षकांप्रमाणे सेवा संरक्षण दयावे.या विविध मागण्यांसाठी आजप्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांचा भव्य मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला या वेळी संतप्त शिक्षकांनी मुंडन करीत राज्य सरकार विरोधात त्रिव निषेध व्यक्त केला.



शिक्षण उपसंचालक कार्यालय, अमरावती येथून जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती असा भव्य मोर्चा काढण्यात आला होता. तदपूर्वी शिक्षण उपसंचालक कार्यालयासमोर शासनाने त्वरीत मागण्या मान्य कराव्या यासाठीनिदर्शने करण्यात आले. शिक्षणमंत्री दिपक केसरकर यांनी अंशतः अनुदानित शिक्षकांना दि. १ जुन २०२४ पासुन टप्पा वाढ दिला जाईल, अशी घोषणा केली परंतु त्या अनुषंगाने कॅबिनेट निर्णय घेवून शासन आदेश अजुन पर्यंत काढलेला नाही. याचसाठी महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालय, शिक्षण उपसंचालक कार्यालय, शिक्षणाधिकारी कार्यालय, यांच्यासमोर अशंतः अनुदानित शिक्षकांनी धरणे आंदोलने, आमरण उपोषने, मुंडन आंदोलने, थाळीनाद आंदोलने मोर्चे काढून आपल्या मागण्यांकरीता संपूर्ण महाराष्ट्र ढवळून काढला तरी अजुन पर्यंत शासनाने निर्णय घेतलेला नाही. यांचाच भाग म्हणून आज हा भव्य विभागीय मोर्चा अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात आला होता. तरी शासनाने त्वरीत न्याय न दिल्यास सर्व अंशतः अनुदानित शिक्षक मुंबई आझाद मैदान सह राज्यभर आंदोलने दि. १६ ऑगस्ट पासुन आनखी तिव्र करतील असा इशारा ही यावेळी देण्यात आला.या आंदोलनात म.रा. कायम विना अनुदानित कती समिती, उच्च माध्य.क.म वि. शिक्षक शिक्षकेत्तर संघटना महाराष्ट्र राज्य व शिक्षक समन्वय संघ, मुख्याध्यापक संघ व अशा अनेक संघटनांचे पदाधिकारी व शिक्षक मोठ्या संख्येने शामिल झाले होते.